रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
♦ वर्ष १६ ♦ अंक १९८
www.ramprahar.com
रविवार, ४ फेब्रुवारी २०२४ ♦ पाने ८ ♦ किंमत ₹ २

## 'टकमक टोकावरून माझा कडेलोट करणारा पैदा झालेला नाही'



**पोलादपूर :** शिवसेना प्रतोद व आमदार भरत गोगावले यांनी, माझा टकमक टोकावरून कडेलोट करणारा अद्याप पैदा झालेला नाही, अशा शब्दांत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. दोन दिवसांच्या रायगड दौऱ्यावर आलेले ठाकरे यांनी पोलादपूर येथील सभेत गद्दारांना टकमक टोक दाखवण्यात रायगड किल्ला याच जिल्ह्यात आहे, असे म्हटले होते. त्याला आमदार गोगावलेंनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सडेतोड उत्तर दिले. टकमक टोकावर जाण्यासाठी पाय आणि मन मजबूत लागते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानीचे ठिकाण असलेल्या रायगडावर आपण किती वेळा आला हो हे तर सांगा. तिथे जाण्यासाठी बऱ्याच पायऱ्या चढायला लागतात. त्या आम्ही पूर्ण केलेल्या आहेत आणि टकमक टोकही अनेकदा पाहिलेले आहे, असेही आमदार गोगावले या वेळी म्हणाले.

## अंतरंग

पेणमध्ये दोन दुचाकींसह चारचाकी जळून खाक/२
रोह्यातील ७०० नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड/५
पनवेलचे तायक्वांदोपटू राष्ट्रीय स्पर्धेत करणार प्रतिनिधित्व/८

# भाजपचे गाव चलो अभियान!

## पनवेलमध्ये बैठक; आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून मार्गदर्शन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पनवेल तालुका कार्यकारिणीची बैठक मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि.३) झाली. या बैठकीत गाव चलो अभियानावर चर्चा करण्यात आली.

पनवेल तालुका भाजप कार्यकारिणीची बैठक शहरातील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, अनुसूचित जाती मोर्चा सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, प्रल्हाद केणी, माजी पं.स.सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष व शिवकरचे सरपंच आनंद ढवळे यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत गाव चलो अभियान विषयावर चर्चा करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने केलेली विकासकामे, योजना, निर्णय, उपक्रम सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी गाव चलो अभियान हाती घेण्यात आले आहे. पनवेलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर आणि जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली ४ फेब्रुवारीपासून या अभियानाला सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी या वेळी दिली.

### स्व. निळकंठ घरत यांना आदरांजली

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष व उरणमधील चिर्ले गावचे भूमिपुत्र निळकंठ घरत यांचे शुक्रवारी निधन झाले. त्यांना या बैठकीत आदरांजली अर्पण करण्यात आली. घरत यांच्या जाण्याने एक चांगला पदाधिकारी गमावल्याची भावना या वेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

## फास्टॅग अपडेटसाठी महिनाभर मुदतवाढ



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नॅशनल अथॉरिटी ऑफ इंडिया (एनएचएआय)ने फास्टॅग केवायसी अपडेट करण्याची तारीख एक महिन्याने वाढवली आहे. यापूर्वी केवायसी पूर्ण करण्यासाठी अखेरची तारीख ३१ जानेवारी होती. आता ती वाढवून २९ फेब्रुवारी करण्यात आली आहे. त्यामुळे वाहनधारकांना दिलासा मिळाला आहे.

टोल प्लाझावर वाहनांच्या सुरळीत वाहतुकीसाठी एनएचएआयने एक वाहन एक फास्टॅग लागू करण्याचा निर्णय लागू केला आहे.

## भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणींना भारतरत्न पुरस्कार जाहीर

### पंतप्रधान नरेंद्र मोदींची माहिती



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान पुरस्कार भारतरत्न जाहीर करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या एक्स खात्यावरून ही माहिती दिली.

पंतप्रधान मोदींनी एक्स पोस्टमध्ये लिहिलेय की, मला हे सांगताना अत्यंत आनंद होत आहे की, लालकृष्ण आडवाणी यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. मी त्यांच्याशी संवाद साधला असून या पुरस्काराबद्दल त्यांचे अभिनंदन केले. आमच्या काळातील सर्वात प्रतिष्ठित नेत्यांपैकी एक असलेल्या अडवाणी यांचे भारताच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान आहे. संघटनेच्या तळापासून त्यांनी कामाला सुरुवात केली आणि उपपंतप्रधानपदापर्यंत मजल मारत देशाची सेवा करण्याचे काम केले. केंद्रीय गृहमंत्री आणि माहिती व प्रसारणमंत्री म्हणून काम करीत असताना त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांनी संसदेत उपस्थित केलेले मुद्दे, त्यांची भाषणे आमच्यासाठी दिशादर्शक आणि समृद्ध असा अनुभव देणारी ठरली आहेत.

**इदं न मम!**

यावर प्रतिक्रिया देताना ज्येष्ठ नेते अडवाणी यांनी म्हटले की,

> **अत्यंत नम्रतेने आणि कृतज्ञतेने मी भारतरत्न पुरस्कार स्वीकारतो. माझ्यासाठी फक्त एक व्यक्ती म्हणून ही सन्मानाची बाब नाही, तर त्या आदर्श आणि मूल्यांचाही सन्मान आहे, ज्यांची मी आयुष्यभर पूर्ण क्षमतेने सेवा करण्याचा प्रयत्न केला.**
> **-लालकृष्ण अडवाणी, ज्येष्ठ नेते, भाजप**

जेव्हा मी १४ वर्षांचा असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघात एक स्वयंसेवक म्हणून सहभागी झालो, तेव्हापासून मी फक्त एकच प्रार्थना केली की, माझ्यावर आयुष्यात जी काही जबाबदारी सोपवली जाईल ती पार पाडताना देशाला समर्पित आणि निस्वार्थ सेवा करावी. हे आयुष्य माझे नाही, तर राष्ट्रासाठी आहे, असे सांगून ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांनी कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि सहकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

## वादग्रस्त नाटकप्रकरणी सहा जणांना अटक

**पुणे : प्रतिनिधी**

हिंदूंच्या भावना दुखावल्याप्रकरणी पुण्यामधील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील ललित कला केंद्राच्या प्रमुखांसह वादग्रस्त नाटकाशी संबंधित सहा जणांना अटक केली आहे.

ललित कला केंद्रात शुक्रवारी सादर करण्यात येत असलेले रामायणावर आधारित 'जब वी मेट' नावाचे वादग्रस्त नाटक अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी उधळून लावले होते तसेच पोलिसांनी या नाटकवाल्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती.

पोलिसांकडून अटक करण्यात आलेल्यांमध्ये ललित कला केंद्राचे विद्यार्थी असलेला नाटकाचा लेखक, दिग्दर्शक भावेश राजेंद्रनबरोबरच त्याच्या चार सहकाऱ्यांचा समावेश आहे तसेच केंद्राचे प्रमुख प्रा.प्रवीण भोळेंनाही या प्रकरणात पोलिसांनी अटक केल्याची माहिती समोर येत आहे.

## गृहमंत्र्यांकडून उल्हासनगरमधील गोळीबाराच्या चौकशीचे आदेश



**बीड : प्रतिनिधी**

उल्हासनगरमधील गोळीबार प्रकरणात वरिष्ठ स्तरावर चौकशी करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस दिले आहेत. बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली.

मागील तीन दिवसांपासून एका ५० गुंठे जमिनीवरून वाद सुरू होता. दरम्यान, शुक्रवारी हे प्रकरण थेट पोलीस ठाण्यात पोहचले. आमदार गणपत गायकवाड यांचा मुलगादेखील पोलीस ठाण्यात होता. या वेळी पोलीस कारवाई करीत नसल्याचा आरोप करीत आमदार गायकवाड पोलीस ठाण्यात पोहचले आणि त्यांनी शिवसेनेचे कल्याण शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला. विशेष म्हणजे, मी स्वतः पोलिसांसमोरच गोळी झाडली मला याचा पश्चाताप नाही, कारण माझ्या मुलांना जर ते पोलिसांच्या समोर मारत असतील, तर मग मी काय करणार. मी त्यांना जीवे मारणार नव्हतो, पण पोलिसांच्या समोर जर असे कोणी करीत असेल, तर आत्मसंरक्षणासाठी हे करणे गरजेचे असल्याचे आमदार गायकवाड म्हणाले.

यावर प्रतिक्रिया देताना गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कायद्यासमोर सगळे समान आहेत. कोण कुठल्या पक्षाचा आहे हे विचार न करता कायदेशीर कारवाई केली जाईल. या संदर्भात वरिष्ठ स्तरावर चौकशीचे आदेश पोलीस महासंचालकांना दिले आहेत.

दरम्यान, गोळीबारप्रकरणी पोलिसांनी आमदार गणपत गायकवाड यांच्यासह तिघांना अटक केली. यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता १४ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सुरुवातीला आमदार गायकवाड यांना व्हीसीद्वारे कोर्टात हजर करणार असल्याचे सांगण्यात आले होते, पण त्यांना प्रत्यक्षात हजर करण्यात आले.

## निवडक

### पाकिस्तानमध्ये निवडणूक आयोग ऑफिसबाहेर स्फोट

**कराची :** पाकिस्तानची सार्वत्रिक निवडणूक चार दिवसांवर आलेली असताना देशात हल्ले आणि स्फोट घडत आहेत. ग्रेनेड हल्ल्यांची घटना ताजी असताना शुक्रवारी रात्री शहरातील निवडणूक आयोगाच्या कार्यालयाबाहेर स्फोट झाला. स्फोटकांची बॅग कर्मचाऱ्याला दिसल्याने त्याने इमारतीबाहेर फेकली.

### शंका खरी ठरली; पूनम पांडे जिवंत!

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेत्री व मॉडेल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पूनम पांडेचे सर्व्हायकल कॅन्सर (गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग)मुळे निधन झाल्याची सोशल मीडिया पोस्ट शुक्रवारी तिच्या टीमकडून करण्यात आली होती, मात्र तिच्या कुटुंबीयांकडून कोणतीही प्रतिक्रिया समोर आली नसल्याने शंका उपस्थित झाली होती. अखेर पूनम पांडे जिवंत असल्याचे समोर आले आहे. तिने स्वतः इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करीत या संदर्भात माहिती दिली असून सर्वांची माफी मागितली आहे.

## कुत्र्याप्रमाणे भुंकणाऱ्या कार्यकर्त्यांकडे बूथचे काम सोपवा

### काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गेंचे अजब विधान



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी बूथ कार्यकर्त्यांची तुलना चक्क कुत्र्यांशी केल्याने वाद निर्माण झाला आहे. दिल्लीच्या रामलीला मैदानात शनिवारी (दि.३) न्यायसंकल्प रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी बोलताना त्यांनी, ज्याप्रमाणे कुत्रा खरेदी करताना तो नीट भुंकतोय की नाही हे तपासले जाते, त्याचप्रमाणे भुंकणाऱ्या कार्यकर्त्यांकडे बूथचे काम सोपवले पाहिजे, असे वादग्रस्त विधान केले. या रॅलीत काँग्रेसच्या बूथस्तरीय कार्यकर्त्यांपासून ते वरिष्ठ नेते सहभागी झाले होते.

बूथ एजंटची नियुक्ती करताना विचारपूर्वक करा. अनेकजण अचानक गायब होतात. आमच्याकडे म्हणतात की, जेव्हा तुम्ही बाजारात जाता तेव्हा चांगला कुत्रा किंवा प्राणी खरेदी करायचा असेल तर बाजारात जाऊन योग्य चाचणी करतात. जर इमानदार प्राणी हवा असेल, तर त्याचा कान पकडून वर उचलतात. कान उचलल्यानंतर जर तो भुंकला तर ठीक, पण जर कुईकुई करीत असेल तर कोणी घेत नाही. त्याचप्रमाणे तुम्ही निवड करताना जो भुंकतोय त्याला घ्या व बूथचा एजंट बनवा, असे मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले.

**भाजपकडून टीका**

भाजपचे आयटी सेलचे प्रभारी अमित मालवीय यांनी मल्लिकार्जुन खर्गे यांच्या विधानावर टीका केली आहे. या पक्षाचा अध्यक्ष आपल्या संघटनेच्या सर्वांत मजबूत आणि महत्त्वपूर्ण दुवा बूथ एजंटला 'कुत्रा' बनवून त्याची चाचणी करू इच्छितो, त्या पक्षाची घसरण नक्की आहे, असे मालवीय यांनी म्हटले आहे.

## शाळकरी मुलांमध्ये राडा; एकावर चाकूहल्ला

**पुणे : प्रतिनिधी**

विद्येचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या पुण्यातील पिंपरी-चिंचवडमध्ये शाळेच्या पटांगणात एका विद्यार्थ्याने दुसऱ्या विद्यार्थ्याच्या पोटात चाकू भोसकले. या घटनेत विद्यार्थी गंभीर जखमी असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पिंपरी पोलिसांनी घटनेचा तपास करीत सहा अल्पवयीन मुलांच्या नातेवाईकांना समजपत्र बजावले आहे. हे सर्व विद्यार्थी नववी आणि दहावीच्या वर्गात शिक्षण घेत असून स्कूल बॅग फाटल्यावरून १ फेब्रुवारी रोजी दोघांमध्ये वाद झाला होता.

एका मुलाने पटांगणात दुसऱ्या मुलाचे दप्तर ओढले असता ते फाटले. यानंतर दोघांमध्ये बाचाबाची झाली, मात्र यानंतर परीक्षा असल्याने दोघेही पेपर सोडवण्यासाठी वर्गात गेला. पेपर संपल्यानंतर ज्याने दप्तर ओढले होते त्याने दोन इतरांना एकत्र करीत मुलाला मारहाण केली. या मुलांपैकी एकाने खिशात चाकू आणला होता. त्याने थेट चाकू काढून पोटात भोसकला. यात मुलगा जखमी झाला. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## १६ नोव्हेंबरलाच राजीनामा दिला; शेवटपर्यंत ओबीसींसाठी लढणार!

### छगन भुजबळ यांचा मेळाव्यात एल्गार



**अहमदनगर : प्रतिनिधी**

हिंमत असेल तर राजीनामा द्या, असे अनेकजण बोलतात, पण १७ नोव्हेंबरला जालन्यातील अंबडला सभा झाली. त्याआधी १६ नोव्हेंबरला मी मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला असून शेवटपर्यंत ओबीसींसाठी लढणार आहे, असे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. ते शनिवारी (दि.३) अहमदनगरच्या ओबीसी एल्गार मेळाव्यात बोलत होते.

मंत्री भुजबळ म्हणाले की, हायकोर्टाचा निकाल आहे, ज्यात न्यायाधीशांनी स्पष्ट म्हटलंय सर्व मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्रे दिली, तर ओबीसींची आरक्षण संपून जाईल. खोटी वंशावळ जुळवण्याचे प्रकार वाढणार आहेत. खोटे प्रमाणपत्र देऊन कुणबी दाखले देण्याचे प्रकार माझ्या हाती आलेत. झुंडशाहीने असे कुणी आरक्षण घेतले तर त्याला कोर्टात आव्हान देता येईल असे निकालपत्रात सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे. आरक्षण मिळाले म्हणून गुलाल उधळला, मग उपोषण कशाला करता? मसुदा आणि अध्यादेश यातला फरक कळत नाही. महाराष्ट्रामध्ये उन्माद केला जातोय. ओबीसी लोकांना त्रास दिला जातोय. मराठा आरक्षणाला आमचा विरोध नाही, मात्र ते वेगळे द्या, असेही भुजबळ या वेळी म्हणाले.

## नमो चषक रांगोळी स्पर्धेत सतीश माने यांची सर्वांगसुंदर कलाकृती




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात आयोजित करण्यात आलेल्या भव्य कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव अर्थात नमो चषक २०२४ अंतर्गत भव्य ऑनलाईन रांगोळी स्पर्धेत सतीश माने यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांनी आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिकृती सुरेख रांगोळीतून रेखाटली होती.

देशाचे कार्यकुशल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताने जगात मोठी झेप घेतली. त्याबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष कार्यकारिणीने दिलेल्या निर्देशानुसार युवा मोर्चाच्या संयोजनाखाली संपूर्ण राज्यात नमो चषक स्पर्धा होत आहेत. त्या अनुषंगाने लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विधानसभा क्षेत्रात भव्य क्रीडा, कला व सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला होता. संस्कृती, शुभकार्यात रांगोळीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्या अनुषंगाने बदलता भारत, भारतीय सण, भारतीय दैवते, प्रभु श्रीराम या चार विषयांवर रांगोळी स्पर्धा झाली.

स्पर्धेत प्रथम क्रमांक सतीश माने, द्वितीय रोहित ढोबळे, तृतीय शीतल वाघमारे; तर कशिश तिखे, शाहू सलगरे, नितु हांडे, नेहा धाडवे, यश पाटील, सुवर्णा कराळे, निशा जोशी या सात जणांनी उत्तेजनार्थ पारितोषिक पटकाविले. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकास सात हजार रुपये, द्वितीय पाच हजार रुपये, तृतीय तीन हजार रुपये, सात उत्तेजनार्थ क्रमांकांना प्रत्येकी एक हजार रुपये तसेच सर्व विजेत्यांना चषक आणि सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण सोहळ्यात सन्मानित करण्यात येणार आहे.



**यशस्वी जैस्वाल**
२०९ धावा
२९० चेंडू
१९ चौकार
०७ षटकार



**जसप्रीत बुमराह**
१५.५ षटके
४५ धावा
०६ विकेट्स
०५ निर्धाव

**विशाखापट्टणम :** इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत भारताचा युवा सलामीवीर यशस्वी जैस्वालने शानदार द्विशतक झळकाविले. त्याच्या या खेळीमुळे भारताने पहिल्या डावात ३९६ धावा केल्या. त्यानंतर इंग्लंडचा पहिला डाव २५३ धावांमध्ये संपुष्टात आला. भारताकडून जसप्रीत बुमराहने सहा गडी बाद केले. दुसऱ्या डावात भारताने दिवसअखेर बिनबाद २८ धावा केल्या असून एकूण १७१ धावांची आघाडी घेतली आहे. कर्णधार रोहित शर्मा नाबाद १३ आणि जैस्वाल नाबाद १५ धावा करून मैदानावर आहेत.

# गहिनीनाथ गडावरील विकासकामांसाठी आणखी निधी देणार : उपमुख्यमंत्री फडणवीस

**बीड : प्रतिनिधी**

गहिनीनाथ गडावर उपमुख्यमंत्री म्हणून नव्हे तर इथला एक सेवेकरी म्हणून आलो असल्याच्या भावना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.३) येथे व्यक्त केल्या. पाटोदा तालुक्यातील गहिनीनाथ गड येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ४८व्या पुण्यतिथी महोत्सवासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. त्या वेळी ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, मागच्या वर्षी मला ध्वज हातात देऊन सेवेकरी केले होते. मी आपल्या मधलाच एक सेवेकरी आहे. इथल्या विकासकामांसाठी यापूर्वी २५ कोटींचा निधी दिलेला आहे. गरज पडल्यास पुन्हा २५ कोटींचा निधी देऊ, असे आश्वासनही त्यांनी या वेळी दिले. या ठिकाणी सुसज्ज स्वागत कमान, कीर्तन मंडप, प्रसाद कक्ष बांधले जाईल. श्री संत वामनभाऊ महाराजांवर प्रेम करणारे गरीब सेवेकरी या ठीकाणी एकत्रित येतात



त्यांची गैरसोय होऊ नये याची काळजी घेतली जाईल. या जिल्ह्याला गडांचा समृद्ध वारसा आहे. येथे नारायणगड, मच्छिंद्रगड, भगवानगड असे पवित्र तीर्थस्थळे आहेत. या सर्व मार्गावरून वारी जात असते. हा मार्ग चांगला होईल याची दक्षता घेतली जाईल. गहिनीनाथ गडावरुन पालखी जात असते. वारीच्या समयी वारकरांसाठी पंढरपूर येथे जागा मिळाली असून जागा दान देणारे आज आपल्यामध्ये आहेत हा सुवर्ण क्षण असल्याचे ते या वेळी म्हणाले.

या कार्यक्रमात मठाधिपती विठ्ठल बाबा महाराज, उत्तम स्वामी, जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे, खासदार प्रीतम मुंडे, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर, सर्वश्री आमदार बाळासाहेब आजबे, सुरेश धस, लक्ष्मण पवार, मोनिका राजळे, माजी मंत्री राम शिंदे आणि जयदत्त क्षीरसागर माजी आमदार भिमराव धोंडे जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आहे. भाविकांवर टाळ मृदुंगाच्या गजरात मंचावरून पुष्पवृष्टी करण्यात आली.

### येथे भाविकांची सेवा करता येते -पालकमंत्री मुंडे

***बीड जिल्हा अध्यात्माचा जिल्हा असून अनेक संत महात्मे या मातीत जन्माला आले आहे. गहिनीनाथ गड हे असेच स्थान आहे. या गडावरील श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्याने ही जमीन पुनीत झाली असून येथे भाविकांची सेवा मला करता येत असल्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे या वेळी म्हणाले.***

## पेणमध्ये दुचाकींसह चारचाकी जळून खाक

### स्टेशनजवळील घटना; मोठे नुकसान

**पेण : प्रतिनिधी**

पेण रेल्वेस्टेशननजीक अचानक लागलेल्या आगीत दोन दुचाकी व एक कार जळून खाक झाली. ही घटना शनिवारी (दि. ३) घडली.

पेण रेल्वे स्टेशनजवळ वाहतूक चौकीच्या बाजूला अपघातग्रस्त गाड्या उभ्या आहेत. येथे असलेल्या गवताला शनिवारी सायंकाळी ५.३० वा.च्या सुमारास अचानक आग लागली. या आगीच्या भक्षस्थानी एक जुनी कार व दोन दुचाकी सापडल्या. त्याचप्रमाणे बाजूला उभ्या असलेल्या अ‍ॅक्टिवालाही या आगीची झळ पोहचून नुकसान झाले आहे. आग विझवण्याकरिता नगरपालिकेच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. पाण्याचा जोरदार मारा करून आग नियंत्रणात आणण्यात आली.

या वेळी अग्निशमन दलाचे अभिजीत गुरव, प्रसन्न पाटील, अभिषेक बंगाली, विशाल बामणे, स्वप्निल म्हात्रे यांनी विशेष मेहनत घेतली तर पोलीस हवालदार डी. पी. थळे यांनी घटनास्थळी उपस्थित राहून परिस्थिती हाताळली.

दरम्यान, आग लागल्याची बातमी पसरताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी एकच गर्दी केली व आगीचे चित्र आपल्या मोबाईलमध्ये कैद करण्यासाठी अनेकांची धडपड दिसून आली. आग नक्की कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.



## सभेत सदस्यावर चप्पल फेकणे शरमेची बाब

### कोल्हारे ग्रामपंचायतीतील प्रकाराचा भाजपकडून निषेध

**कर्जत : प्रतिनिधी**

भ्रष्टाचारविरुद्ध लढणाऱ्या सदस्यावर ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये हात उगारणे आणि चप्पल फेकून मारणे ही समस्त महिला जातीला शरमेने मान खाली घालायला लावणारी कृती आहे, अशा शब्दांत भाजपच्या महिला पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत निषेध व्यक्त केला.

कर्जत तालुक्यातील कोल्हारे ग्रामपंचायतीचे सदस्य आणि भाजपचे कार्यकर्ते विजय हजारे यांनी ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये सत्ताधाऱ्यांच्या कामाबद्दल आक्षेप घेत असताना उपस्थित तीन महिला सदस्यांनी चप्पल फेकून मारण्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.



या घटनेचा निषेध करण्यासाठी भाजप महिला मोर्चाचे पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती. या वेळी भाजप महिला मोर्चा प्रदेश चिटणीस मृणाल खेडकर, जिल्हा उपाध्यक्ष विनिता घुमरे, कर्जत तालुकाध्यक्ष नम्रता कांदळगावकर आणि नेरळ शहराध्यक्ष श्रद्धा कराळे उपस्थित होत्या.

प्रदेश चिटणीस मृणाल खेडकर यांनी, कोल्हारे ग्रामपंचायतीमधील महिला उपसरपंच या जागेवरून उठून भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठविणाऱ्या आणि स्वतः कधीही भ्रष्टाचार न करणाऱ्या ग्रामपंचायत सदस्य विजय हजारे यांच्यावर हात उगरतात. त्यानंतर परिस्थिती बघून विजय हजारे हे बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत असताना उपसरपंच आणि अन्य तीन ग्रामपंचायत सदस्य चप्पल फेकून मारतात ही महिला वर्गासाठी शरमेची बाब आहे. हे सर्व चित्रण सीसीटिव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाले असल्याने संपूर्ण महिला वर्गाला समाज माध्यमांवर टीकेला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अशा कृतीचा भाजप निषेध करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

भाजप महिला मोर्चाकडून आम्ही आमच्या वरिष्ठांच्या निदर्शनास हा विषय आणून भाजप कार्यकर्त्यांचे खच्चीकरण करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई व्हायला हवी, अशी मागणी आम्ही करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## खालापुरातील तरुणांचा भाजपमध्ये प्रवेश

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील भोकरपाडा या गावातील तरुणांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर व ज्येष्ठ नेते माजी आमदार सुरेश लाड यांचे विश्वासू माजी जि.प. सभापती नरेश पाटील यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

गणेश डोखले, सचिन डोखले, केतन डोखले, यश डोखले, जितेश दुधाने, प्रमोद पाटील, सनी डोखले, ऋषीकेश देवकर, संचित डोखले, जीवन डोखले, भगवान पाटील, नयन डोखले, सुमित डोखले, साहील डोखले, राज कुलकर्णी, कुणाल फाटे, त्याप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस तालुका महिला सरचिटणीस सुप्रिया संतोष तटकरे सावरोली यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

या वेळी भाजप युवा मोर्चा कर्जत खालापूर विधानसभा संयोजक प्रसाद पाटील, खालापूर शहर अध्यक्ष दिपक जगताप, भाजप जिल्हा कार्यकारिणी सदस्य श्वेता मणवे, निकिता हेलंडे, साजगाव जि.प. वार्ड अध्यक्ष भरत महाडिक, प्रवीण मनवे, राकेश देशमुख, माधव ठोंबरे यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश करण्यात आला.



## पर्यटन क्षेत्रात उद्योजिकांसाठी नवी कर्ज योजना; लाभ घेण्याचे पर्यटनमंत्र्यांचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

पर्यटन हे सर्वात वेगाने वाढणारे क्षेत्र आहे. त्यामुळे महिलांचा पर्यटन क्षेत्रातील सहभाग वाढावा, महिलांमध्ये उद्योजकता आणि नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी पर्यटन विभागाने आई हे महिला केंद्रित धोरण जाहीर केले आहे. या धोरणांतर्गतच महिला उद्योजिकांसाठी नवी कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे. पर्यटन क्षेत्रात काम करणाऱ्या महिला उद्योजिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे.

पर्यटन संचालनालयाकडे नोंदणीकृत असलेले व्यवसाय असल्यास संबंधित उद्योजिका महिला या योजनेसाठी अर्ज करू शकतात, तसेच पर्यटन व्यवसायामध्ये ५० टक्के व्यवस्थापकीय व इतर कर्मचारी महिला असणे आवश्यक आहे. पर्यटन व्यवसायाकरिता आवश्यक सर्व परवानग्या प्राप्त असाव्यात. पर्यटन संचालनालयाकडे नोंदणीकृत महिलांच्या मालकीच्या आणि त्यांनी चालविलेल्या पर्यटन क्षेत्राशी निगडित व्यवसायाकरिता मान्यताप्राप्त बँकांमार्फत घेतलेल्या १५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाच्या रक्कमेवरील व्याज परतावा देण्यात येईल. या योजनेसाठी व्याजाची रक्कम १२ टक्केच्या मर्यादेत त्यांच्या खात्यात पूर्ण कर्ज परतफेड होईपर्यंत किंवा सात वर्षे कालावधी पर्यंत किंवा व्याजाची रक्कम ४.५ लाख रुपयांच्या मर्यादेपर्यंत असावे. या तीन पर्यायांपैकी जे आधी घडेल तोपर्यंत व्याजाचा परतावा म्हणून देण्यात येईल.

राज्यातील महिला पर्यटक उद्योजिकांनी अधिक माहितीसाठी www.maharashtratourism.gov.in या संकेतस्थळावर अथवा मुख्यालय (०२२-६९१०७६००)क्रमांकावर संपर्क साधावा. त्याचप्रमाणे जिल्ह्यांच्या ठिकाणी जिल्हा पर्यटन अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. कोकण (+९१ ९६०४३२८०००), पुणे (९४२३७ ७५५०४), नाशिकसाठी (९६८९९०८१११), छत्रपती संभाजी नगर (८९९९०९७२५५), नागपूर आणि अमरावती (८४२२८ २२०५८/९२२६७७९७२९) या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन पर्यटन संचालनालय, पर्यटन विभाग, यांच्याकडून करण्यात आले आहे.

## मराठी साहित्यात तृतीयपंथीयांच्या व्यथा, वेदनांची मांडणी व्हावी

### परिसंवादात आशावाद

**जळगाव : प्रतिनिधी**
**(साने गुरुजी साहित्यनगरी)**

साहित्य समाजाचा आरसा आहे. राज्य घटनेत प्रत्येकाला समान हक्क व संधी प्रदान केले आहेत. असे असतांना मराठी साहित्यात तृतीयपंथीय समुदायाचे चित्रण दिसून येत नाही, तसेच तृतीयपंथीयांना समान वागणूक मिळत नाहीत. तेव्हा मराठी साहित्यिक व लेखकांनी तृतीयपंथीय, पारलिंगी समुदायाच्या दुःख, व्यथा, वेदना, समस्या जाणून घेऊन साहित्यात चित्रण करावे, असा आशावाद तृतीयपंथी समुदायाचे मराठी साहित्यातील चित्रण आणि स्थान या विषयावरील परिसंवादात सहभागी वक्त्यांनी व्यक्त केला.

भारत निवडणूक आयोगाच्या अधीनस्त कार्यरत असलेल्या महाराष्ट्रातील मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत ९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कविवर्य ना. धों. महानोर सभागृहात 'तृतीयपंथी समुदायाचे मराठी साहित्यातील चित्रण




आणि स्थान या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादात एलजीबीटीआयक्यू समुदायाचे अभ्यासक आणि बिंदू क्वीअर राईट्स फाऊंडेशनचे अध्यक्ष बिंदुमाधव खिरे, तृतीयपंथी म्हणजेच पारलिंगी समुदायातील सामाजिक कार्यकर्त्या शमिभा पाटील, विजया वसावे, पूनीत्त गौडा, डैनियल्ला मॅक्डोन्सा आणि महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे हे सहभागी झाले.

मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे म्हणाले की, लोकशाहीच्या निवडणूक प्रक्रियेत तृतीयपंथीय समुदायाचे स्थान जसे महत्त्वपूर्ण आहे. तसे मराठी साहित्यात ही तृतीयपंथीय समुदायाचे वास्तववादी चित्रण झाले आहे.

बिंदू माधव खिरे म्हणाले की, तृतीयपंथीय समुदायाचे साहित्यातील व समाजातील स्थान समजून घेतांना लिंग, लिंगभाव व लैंगिकता ह्या शब्दांचे अर्थ समजून घेतले पाहिजेत. पुनीत गौडा म्हणाले की, पारलिंग पुरूष जन्माने स्त्री असतो, मात्र मनाने तो पुरूष असतो. त्यांचे मन पुरूषाप्रमाणे घडत असते.

डैनियल मॅक्डोन्सा म्हणाल्या की, माणसाला माणसाप्रमाणे वागविण्यासाठी धर्माची गरज पडत नाही. तृतीयपंथीय व्यक्तींचे मन समाजाने समजून घेतले पाहिजेत. शमिभा पाटील म्हणाल्या की, पारलिंगी समुदायाचे साहित्यात चित्रण जास्त झाले नाही. अण्णाभाऊ साठे यांच्यानंतर अनेक वर्षांचा कालखंडात लिखाण झाले नाही. स्वाती चांदोरकर, दिशा पिंकी शेख, लक्ष्मी, पारू, मदन नाईक, नागा किन्नरी यांनी पारलिंगी समुदायाचे चित्रण त्यांच्या पुस्तके व कवितांतून मांडले आहे. तृतीयपंथीय समुदायाची स्वतःची भाषा असते. तृतीयपंथी समाज आता समाज माध्यमातून लिहायला लागला आहे. साहित्य विश्वाने आमच्या जगण्याचे प्रश्न मांडले पाहिजेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## महाडमध्ये बंद फ्लॅट फोडून आठ लाख ९० हजारांचा ऐवज लंपास

**महाड : प्रतिनिधी**

शहरातील प्रभात कॉलनी परिसरात असलेल्या एका इमारतीमधील फ्लॅट अज्ञात चोरट्याने फोडून घरातील दागिने आणि महत्त्वाची कागदपत्रे लंपास केली आहेत. याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

शहरात प्रभात कॉलनी परिसरातील साई पॅलेस इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावर असलेला सेऊल सुभाष शेठ (वय ३८) यांच्या फ्लॅट अज्ञात चोरांनी गुरुवारी (दि.१) ते शनिवारी (दि.३) पहाटे ४ वा. च्या दरम्यान फोडला. चोरांनी घरातील सोने आणि चांदीचे दागिने तसेच घरासंदर्भातील महत्त्वाची कागदपत्रे लंपास केली. लॉकरमध्ये असलेले सोन्याचे ब्रेसलेट, सोन्याचे कडे, सोन्याचे कॉइन, सोन्याचे गळ्यातील सूर्यचित्र असलेले पान, चांदीचा तुकडा, चांदीचे कॉईन, चांदीची फ्रेम, चांदीचे ब्रेसलेट आणि दोन लाख ५० हजार रुपये रोख रक्कम, इतर कागदपत्रे असा एकूण आठ लाख ९० हजार १५० रुपयांचा ऐवज लंपास केला.

याप्रकरणी सुभाष शेठ यांनी फिर्याद दाखल केली असून महाड शहर पोलीस ठाण्यात चोराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## माणगावजवळ दुचाकीची रिक्षाला धडक; पाच जण जखमी

**माणगाव** : इंदापूर-तळा रस्त्यावर इंदापूर येथील मंदिरासमोर भरधाव दुचाकीने विरुद्ध दिशेला येत रिक्षाला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोन्ही वाहनांमधील मिळून पाच जण जखमी झाले. हा अपघात शुक्रवारी (दि.२) दुपारी ३:३० वा.च्या सुमारास घडला. दुचाकीवरील चालक सुरेश चंदर कोळी (रा. मूठवलीतर्फे तळे) हा त्याच्या दुचाकी (एमएच. ०६ बीएच ४२८०)वरून इंदापूरकडून तळाकडे भरधाव वेगाने येत असताना समोरून येणाऱ्या रिक्षा (एमएच. ०६ बीव्ही. १०३०)ला धडकल्याने अपघात घडला. या अपघातात झाकीर परदेशी, मुजम्मिल राऊत, जलील लोखंडे (तिघेही रा. निजामपूर, माणगाव), सुरेश कोळी (रा. मूठवलीतर्फे तळे), रोहिदास जाधव (रा. बोरघार, तळा) हे पाच जण जखमी झाले.

## निवडक

### महाविद्यालयातून सामानाची चोरी

**पनवेल :** एका महाविद्यालयाच्या सामान ठेवण्याच्या खोलीतून ९० हजार रुपये किंमतीचे प्लंबिंगचे सामान चोरीस गेल्याची घटना खारघर येथे घडली आहे. येथील अपेजी सत्या इंटरनॅशनल सेंटर महाविद्यालयाच्या इमारतीच्या दुसर्या मजल्यावर सामान ठेवण्याच्या खोलीत जवळपास ९० हजार रुपये किंमतीचे प्लंबिंगचे सामान अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई

**पनवेल :** तीन पत्ते जुगार खेळल्या प्रकरणी तिघा जणांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वारशी फर्निचरच्या मागील भिंती लगत सुकापुर रोड येथे तीन पत्ता नावाचा जुगार खेळला जात असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली. त्यानुसार पोलीस त्या ठिकाणी गेले. या वेळी पोलिसांनी संदेश भागोजी टेंबे (राहणार बोनशेत), दीपक श्री लाटोसिंह कुमार (राहणार सुकापुर), अमित राम आश्रय यादव (राहणार सुकापुर) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून रोख रक्कम आणि पत्ते जप्त करण्यात आले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### पतीची पत्नीला मारहाण

**पनवेल :** नवीन पनवेल चंद्रभागा चाळ ए टाईप येथे पतीने ब्युटी पार्लरच्या स्टीमरने पत्नीला मारहाण केल्याप्रकरणी पतीविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चंद्रभागा चाळ येथे महिलेचा पती दारू पिऊन आला व एक्टिवा गाडी सामान आणण्यासाठी बाजारात घेऊन का गेली या गोष्टीचा राग येऊन त्याने ब्युटी पार्लरच्या स्टीमरने पत्नीला मारले आणि पोटात लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

# चोरीच्या घटनांमध्ये वाढ; गुन्हे दाखल

## कळंबोलीच्या लोखंड बाजारात साडेसात लाखांच्या स्टीलची चोरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल परिसरामध्ये चोरीच्या घटना वाढत आहेत. कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजारात चोरीचे सत्र सुरूच आहे. गुरुवारी कळंबोली पोलीस ठाण्यात लोखंड बाजारातील गोदाम क्रमांक १९२८ मध्ये सात लाख ३३ हजार रुपयांचे स्टेनलेस स्टील चोरीला गेल्याची तक्रार व्यापाऱ्यांनी नोंदविली. ही चोरी २५ डिसेंबर ते ९ जानेवारी या दरम्यानमध्ये झाली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी बाजारातील वाढत्या चोऱ्या रोखण्यासाठी स्वता बाजाराच्या स्थितीची पाहणी केल्यानंतर १०० सीसीटिव्ही कॅमेरे लावण्याचे बाजार समितीला सूचविले. सध्या सीसीटिव्ही कॅमेरे लावण्याचे काम सूरु असले तरी रात्रीच्या वेळी रस्त्यावरील पथदिव्यांची विज घालवून गोदामे फोडणारी टोळी बाजारात सक्रीय आहे.

महाराष्ट्रातील सर्वाधिक लोखंड व पोलाद खरेदीविक्रीची उलाढाल कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजारात होते. हा बाजार मात्र असूरक्षित आहे. बाजारातील असुविधांमुळे व्यापारी त्रस्त झाले आहेत. पथदिवे बंद असणे, पोलिसांची गस्त अपुरी आणि सीसीटिव्ही कॅमरा नसने हे सारे चोरट्यांसाठी पोषक वातावरण आहे. चोरीच्या तक्रारींसाठी पोलीस ठाण्यात व्यापारी किंवा त्यांचे प्रतिनिधी गेल्यावर त्यांनाच मालाची पावती दाखवा, सीसीटिव्ही लावले का, रखवालदार का नेमले नाही अशा प्रश्नांना सामोरे जावे लागते. त्यामुळे वैतागुण मागील पाच वर्षात व्यापारी किरकोळ चोरीच्या तक्रारींसाठी पोलीस ठाण्यात येत नाहीत.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्याकडे काही व्यापाऱ्यांनी थेट ही व्यथा मांडल्यानंतर मागील वर्षी जानेवारी महिन्यात गोदाम क्रमांक ६६४ मध्ये स्थानिक पोलीसांना अंधारात ठेऊन पोलीसांच्या विशेष पथकाने धाड टाकून दिडशे मेट्रीक टन सळईंचा ३५ लाख रुपयांचा माल जप्त केला. १२हून अधिक आरोपी या प्रकरणात पोलीसांच्या तावडीत सापडले. वर्ष उलटल्यानंतर पुन्हा या बाजारातील सळईचा अवैध व्यवसाय तळोजा परिसरात छुप्या पद्धतीने केला जात असल्याची चर्चा आहे.

अजूनही व्यापाऱ्यांच्या मागील चोरट्यांची शुक्लकाष्ट संपलेले नाही. कळंबोली येथील लोखंड गोदाम क्रमांक १९२८ येथील व्यापारी सूरेशकुमार बोहरा यांनी दिलेल्या तक्रारीनूसार २५ डिसेंबर ते ९ जानेवारी या दरम्यानच्या काळात सात लाख ३३ लाख ९०० रुपयांचे स्टेनलेस स्टीलचे सामान चोरट्यांनी गोदामाच्या पाठीमागील पत्रा तोडून गोदामात प्रवेश करून लुट केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

### चोरट्यांना हद्दपार करण्याची अपेक्षा

*कळंबोलीतील लोखंड बाजारातील चोऱ्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी दोनच दिवसांपूर्वी पोलीस ठाण्याच्या प्रभारी वरिष्ठ पोलीस निरिक्षक पदी राजेंद्र पाटील यांची नियुक्ती आयुक्त भारंबे यांनी केली आहे. यापूर्वी पोलीस ठाण्यात लोखंड बाजारातील भंगार व्यावसायिकांचा ये-जा होता. पाटील हे या सर्व चोरट्यांना कळंबोलीतून हद्दपार करतील अशी अपेक्षा आहे.*

## खारघरमध्ये दुपारी तीन तासांत पावणेचार लाखांची घरफोडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील सेक्टर १९ येथील सिद्धिविनायक सोसायटीमध्ये गुरुवारी दुपारी सव्वादोन वाजता ते सव्वापाच वाजण्याच्या दरम्यान एका बंद घरात लिरून चोरट्यांनी सोनेचांदीचे दागिने व रोखड चोरी केली.

संदीप पटेल यांच्या घरात ही चोरी झाली असून पटेल यांनी खारघर पोलिसांना दिलेल्या तक्रारीनूसार घरात कोणीही नसताना गुरुवारी दुपारी चोरट्यांनी घराच्या सूरक्षा दरवाजाची कडी तोडून मुख्य दरवाजाचे कुलुप तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली. तब्बल पावणेचार लाख रुपयांची या घरफोडीतील आरोपींना शोधण्यासाठी खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजीव शेजवळ यांनी खास पथक नेमले आहे.

## सोन्याची गंठण खेचून चोरटे पसार

**पनवेल :** रिक्षात बसलेल्या ३८ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याची गंठण जबरदस्तीने खेचून चोरटे दुचाकीवरून पळून गेले आहेत. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

दर्शना दिलीप पाटील ह्या शिवकर येथे राहत असून त्या रोडपाली येथे नातेवाईकांकडे जाण्यासाठी वडील बबन फडके, भाऊ सुनील फडके, रीना फडके व मुलगी किमया असे भावाच्या रिक्षाने निघाले. त्यांचा भाऊ सुनील हा रिक्षा चालवत होता. रोडपाली रिक्षामध्ये येत असताना डी मार्ट समोरील रस्त्यावर टन मारताना स्लो झाली. रिक्षा स्लो असताना दोन व्यक्ती मोटरसायकल वरून मागून आले आणि त्यांनी रिक्षात हात टाकून गळ्यात असलेले गंठण जबरदस्तीने ओढले. पाच तोळे वजनाची सोन्याची गंठण खेचून नेणाऱ्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## विचुंबेमध्ये आज हळदीकुंकू समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मकरसंक्रांती ते रथसप्तमी या काळात हळदीकुंकू समारंभ होत असतात. याअनुषंगाने भारतीय जनता पक्ष विचुंबे, दुर्गातामा मित्रमंडळ, मंगलमुर्ती मित्र मंडळ, रमाई महिला मंडळ व ग्रामस्थ मंडळ विचुंबेच्या संयुक्त विद्यमाने हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

विचुंबे ग्रामपंचायत कार्यालयाच्या बाजूला विठ्ठल रखुमाई मंदिरासमोर होणारा कार्यक्रम रविवारी (दि. ४) सायंकाळी ५ ते ७ या वेळेत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या वेळी महिलांसाठी आदिती ढवळे प्रस्तुत होम मिनिस्टर खेळ पैठणीचा खास कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये गप्पा-गोष्टी, रंजक खेळ, हिंदी व मराठी गाणी सोबत कॉमेडीचा तडका असणार आहे.

## पनवेलमधील ६,६६३ अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना मिळणार साडी

**पनवेल : प्रतिनिधी**



अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना शासनाच्या माध्यमातून प्रत्येकी एक साडी भेट दिली जाणार आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून पनवेल तालुक्यातील सहा हजार ६६३ अंत्योदय शिधापत्रिकांना ही साडी स्वस्त धान्य दुकानात दिली जाणार असल्याची माहिती तालुका पुरवठा अधिकाऱ्यांनी दिली.

स्वस्त धान्य दुकानांमध्ये अन्नधान्याबरोबरच आता साडीही मिळणार आहे. राज्य शासनाच्या वस्त्र उद्योग विभागाने या संदर्भातील निर्णय घेतला असून अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. ही योजना २०२३ ते २०२८ या पाच वर्षांसाठी निश्चित करण्यात आली आहे. पनवेल तालुक्यात सहा हजार ७१२ अंत्योदय कार्डधारक आहेत. यापैकी सहा हजार ६६३ अंत्योदय कार्डधारकांना साडी मिळणार आहे.

अंत्योदय शिधापत्रिकांच्या यादीनुसार पनवेल तालुक्यातील रास्त भाव दुकानांच्या नावानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या तालुका स्तरावरील गोदामात साड्यांचे गड्डे पोहचवण्यात येणार आहेत. या योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या साडीचे वितरण एका विशिष्ट सणाच्या दिवशी केले जाणार असल्याचे पनवेलचे पुरवठा अधिकारी प्रदीप कांबळे यांनी सांगितले.

## उरण नगर परिषदेकडून अतिक्रमणविरोधी कारवाई

**उरण : वार्ताहर**



उरण नगर परिषद मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उरण नगरपरिषद अतिक्रमण पथकाने उरण बाजार पेठेतील रस्त्याच्या दोन्ही बाजूस दुकानदारांनी उरण नगरपरिषदच्या जागेवर केलेल्या अतिक्रमण कारवाई केली. रस्त्याच्या दोन्ही बाजूस असलेल्या फळांच्या हातगाड्या, भाजीवाले आदींचे हातगाड्या हलविण्यात आल्या.

उरण नगरपरिषद हद्दीतील उरण बाजार पेठेत नेहमीच वाहतुकीची कोंडी होत असते. त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. वाहतुकीला अडथळा होवू नये. नागरिकांना होणारा त्रास होवू नये या उद्देश्याने उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उरण शहरात शुक्रवारी (दि. २) अतिक्रमण विभागाने उरण उरण शहरातील बाजारपेठेतील रस्त्याच्या दोन्ही बाजूस असलेल्या नगर परिषदेच्या जागेवर अतिक्रमण केलेल्या हातगाड्या, फळांची दुकाने हटविण्यात आली. त्यामुळे रस्त्यावर होणाऱ्या वाहतूक कोंडी कमी झाली व नागरिकांना होणारा त्रास कमी झाला. या कारवाईमध्ये उरण नगर परिषद अतिक्रमण अधिकारी, कर्मचारी, कामगार सहभागी झाले होते.

दरम्यान, या कारवाईमुळे अनधिकृत व्यावसायिकांना चांगलाच चाप बसला आहे.

> **उरण शहरातील बाजार पेठेतील रस्त्यालगत असणारी दुकाने ज्यांनी उरण नगर परिषदेच्या जागेवर केलेल्या अतिक्रम वेळोवेळी हरविण्यात येईल. वेळोवेळी अतिक्रमण भरारी पथक काम करणार आहे. बाजार पेठेतील रस्त्यावरील केलेल्या अतिक्रमणे उठविण्यात येईल.**
>
> **-समीर जाधव, मुख्याधिकारी, उरण नगर परिषद**

## खारघर येथे आज सत्याग्रह महोत्सव

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

खारघर येथील सिध्दार्थ मल्टिपरपज रेसिडेन्शल हायस्कूल, डॉ. जी. के. डोंगरगावकर इंटरनॅशनल स्कूल, सत्याग्रह ज्युनिअर कॉलेज, सत्याग्रह महाविद्यालय, सत्याग्रह अध्यापक महाविद्यालयच्या वतीने सत्याग्रह महोत्सवाचे आयोजन रविवारी (दि. ४) सायंकाळी ६ ते ९ वेळात, संविधान मैदान, पेठगाव, सेक्टर ३३, खारघर, नवी मुंबई येथे आयोजित केले आहे. यावेळी नेट सेट, पीएचडीधारक विद्यार्थी, शिक्षक आणि संस्थेतील सर्वोत्कृष्ट उल्लेखनीय यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार विवेक गिरधारी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

अमृतकालीन विकासीत भारत संकल्पावर आधारीत विविध कला, नृत्य, संगीतमय, गायन आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरणया शाळेतील विद्यार्थी या वेळी करणार आहेत.

प्रसिध्द मराठी गायक संदेश उमप, संगीत विशारद महेश गुप्ता यामध्ये प्रमुख पाहुणे आहेत. प्रसिध्द स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रज्ञा डोंगरगावकर उद्घाटक आहेत. आमदार प्रशांत ठाकूर विशेष अतिथी आहेत. जे. पी. डांगे माजी मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रीत करण्यात आले आहे. ॲड. मनोज म्हात्रे यांच्या हस्ते शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केलेल्या कला, नृत्य आणि प्राविण्यासह परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विदयार्थ्यांचा सत्कार व आदर्श माता-पित्याचा सन्मान करण्यात येणार आहे.

हा महोत्सव नवी मुंबईतील नागरिकाच्या प्रबोधनाची विशेष पर्वणी आहे. हा महोत्सव सर्वांसाठी खुला आणि निशुल्क आहे. विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे अशी विनंती संस्थेच्या वतीने प्रा. नेहा राणे, प्रा. वनिता सुर्यवंशी, प्रा. अमरचंद हाडोळतीकर, राजरत्न डोंगरगावकर, नेहा कपोते, एम. एल. सुर्यवंशी, सुजाता भोसले यांनी केले आहे. हा कार्यक्रम संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे, असे प्रा. डॉ. डोंगरगावकर यांनी कळवले आहे.

## सीकेटी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे मंगळवारी (दि. ६) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि दर्पण २०२४चे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

या वेळी पहिल्या सत्रात विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करण्यासाठी प्रमुख अतिथी कुलगुरू, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबईचे, मा. प्रो. डॉ. रजनीश के. कामत, अध्यक्ष संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर सीताताई पाटील, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य अनिल भगत, वर्षा ठाकूर, संजय भगत, राज अलोनी, हरिश्चंद्र पाटील, भरत ठाकूर, संजय पाटील, पनवेल शहर महापालिकेचे माजी नगरसेवक नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, पनवेल शहर भाजपचे अध्यक्ष जयंत पगडे आदी विशेष उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे.

दुसऱ्या सत्रात दर्पण २०२४ या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते व संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य परेश ठाकूर व सन्मानीय अतिथी प्रसिद्ध अभिनेता गौरव मोरे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तसेच माजी उपमहापौर पनवेल महापालिका, चारुशीला घरत संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रकाश भगत व हरिभाऊ पाटील, पनवेल शहर महापालिकेचे माजी नगरसेवक संतोष शेट्टी, विक्रांत पाटील, एकनाथ गायकवाड, हेमलता म्हात्रे व राजश्री वावेकर आदींची विशेष उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे. याचबरोबर प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, कलाशाखेचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील, वाणिज्यशाखेचे प्रमुख प्रो. डॉ. एस. बी. यादव, विज्ञानशाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर आणि आय. क्यू. ए. सी. विभागाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन.वाजेकर आदी उपस्थित राहणार आहेत.

महाविद्यालयातील क्रीडा, कला, संशोधन, सेवा क्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांनी विभागीय, विद्यापीठीय, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर दैदिप्यमान यश प्राप्त केले अशा विद्यार्थ्यांचा आणि महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार होणार आहे. महाविद्यालयातील शैक्षणिक पात्रता वृद्धिंगत करणारे प्राध्यापक वर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनासुद्धा सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा नृत्य, गायन आणि अभिनय यांचा कला संगम असणारा दर्पण २०२४ हा कार्यक्रम करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभागाचे समन्वयक गणेश जगताप, सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख डॉ. गीतिका तंवर आणि विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण विभागाच्या समन्वयक डॉ. मंदा म्हात्रे अथक परिश्रम घेत आहेत.

## खरी कमाई जिल्हास्तरीय उपक्रमात सीकेटी मराठी प्राथमिक विद्यालयाचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रायगड, भारत स्काऊट आणि गाईड अंतर्गत खरी कमाई या जिल्हास्तरीय उपक्रमात चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक प्राप्त केला. पुनिता गुरव शिक्षणाधिकारी (प्राथमिक, जिल्हा, रायगड) यांच्या हस्ते प्रवीण पाटील यांनी पारितोषिक स्वीकारले.

कब-बुलबुल युनिटमधील सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेऊन मेहनत केली. त्यांना मुख्याध्यापक सुभाष मानकर, कब मास्टर प्रवीण पाटील व फ्लॉक लीडर लता मोटे यांचे मार्गदर्शन लाभले.

आम्ही १९९८पासून कब-बुलबुल युनिट चालवत आहोत. दरवर्षी आम्ही एक दिवसीय शिबिर घेतो. शिबिराच्या माध्यमातून श्रममुल्याचे महत्त्व व जाणीव करून देतो. स्वच्छता राखणे आज्ञा पाळणे , शिस्त पाळणे, स्वावलंबन व सहकार्य हे गुण विद्यार्थ्यांमध्ये अवगत होण्यासाठी प्रयत्न करतो. कब-बुलबुल युनिटमधील विद्यार्थी दरवर्षी संविधान दिनानिमित्त एका जागर फेरीचे आयोजन करतात.

## बीसीटी विधी महाविद्यालयातर्फे स्पर्धा व उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते, थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या जयंतीनिमित्त खांदा कॉलनीतील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाच्या वतीने राज्यस्तरीय एक्सटेम्पोर ॲलोकेशन कॉम्पिटिशन (पूर्वतयारीशिवाय वक्तृत्त्व स्पर्धा) व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमात बॉम्बे हायकोर्टाचे न्यायाधीश प्रदीप शिंदे, ॲड. दिलीप शिंदे यांच्यासह विविध मान्यवरांनी व्याख्यानातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय एक्सटेम्पोर ॲलोकेशन कॉम्पिटिशनमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागत घेतला.


### जाहीर सूचना

याद्वारे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, आम्ही आमच्या अशिलांच्या निर्देशांनुसार, याखाली लिहलेल्या **अनुसूचीमध्ये** अधिक विशेषत: वर्णन करण्यात आलेल्या जमिनीच्या खंडासंदर्भात (**"अनुसूची मालमत्ता"**) सीआयएन यु४५३०९एमएच२०२२पीटीसी३७५२३० धारक आणि फ्लॅट क्र. ७०१, प्लॉट क्र. १४, माउंट व्हयू सीएचएस, सावरकर नगर, पंच पाखाडी, ठाणे पश्चिम, महाराष्ट्र ४००६०६ येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली एक कंपनी **एम एम लाइफस्टाइल क्रिएटर्स प्रायव्हेट लिमिटेड ("कंपनी")** यांचे मालकी हक्क, शिर्षक आणि हितसंबंधाची चौकशी करीत आहोत.

सर्व व्यक्तींचे अनुसूची मालमत्ता किंवा तीच्या कोणत्याही भागा/हिस्स्या विरोधात / वर / संदर्भात कंपनीचे हक्क, शिर्षक, हितसंबंधाबाबत तसेच कोणत्याही हस्तांतरणीय विकास हक्कांमध्ये, फ्लोअर स्पेस इंडेक्समध्ये किंवा अनुसूची मालमत्तेवर किंवा तीच्या कोणत्याही भागा/हिस्स्यावर बांधलेले किंवा बांधले जाणारे कोणतेही बांधीव क्षेत्रामध्ये, विक्री, हस्तांतरण, गहाणवट, भार, हमी, बोजा, विक्रीचा करार, नियुक्ती, भाडेपट्टी, भाडेपट्टीचा करार, उप-भाडेपट्टी, कुळ, परवाना, भोगवटा हक्क, काळजीवाहू हक्क, विकास हक्क, संयुक्त विकास हक्क, विकास व्यवस्थापन करार, संयुक्त उपक्रम, पर्याय करार, वाटप, बुकिंग, वस्तुविनिमय व्यवस्था, ताबा, धारणाधिकार, प्रतिज्ञा, करार, वक्फ, देखभाल, सुलभता, मार्गाचा अधिकार, आरक्षण, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, करार, भेट, प्रलंबीत दावे, विनिमय, भाग, फायदेशीर हित, त्याग, विभाजन, मुखत्यारपत्र, कोणत्याही न्यायालयाचा किंवा इतर कोणत्याही वैधानिक किंवा निर्णय देणारे अधिकाऱ्यांचा आदेश किंवा हुकूम किंवा निर्देश किंवा इतर कोणत्याही पद्धतीने किंवा कोणत्याही स्वरुपाचे कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, लेखी किंवा तोंडी, दावा आणि/किंवा मागणी आणि/किंवा आक्षेप आणि/किंवा वाटा आणि/किंवा लाभ (**"दावे"**) असल्यास त्यांनी याद्वारे खैतान ॲण्ड कंपनी, वकिल यांना वन वर्ल्ड सेन्टर, टॉवर-१, १३वा मजला, सेनापति बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री. अमित एच वाधवानी यांना लक्षवेधासाठी चिन्हांकित करुन) या ईमेल वर सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** कालावधीत, ज्यावर असे दावे / आक्षेप नोंदवले गेले आहेत, त्यांच्या मूळ सहाय्यक कागदोपत्रासमवेत लेखी कळवणे आवश्यक आहे, अन्यथा, असे कोणतेही दावे अस्तित्वात नाहीत असे गृहीत धरले जाईल आणि जरी असे दावे कायद्यात अस्तित्वात असले तरी किंवा अन्यथा, असे मानले जाईल की दावेदारानी असे दावे सोडले आहेत आणि/किंवा असे दावे वापरण्याचा कोणताही अधिकार सोडुन दिले आहेत आणि ते कंपनी आणि/किंवा आमच्या अशिलांवर बंधनकारक नाही असे समजले जाईल.

**अनुसूची मालमत्ता**

जिल्हा रायगड, तालुका पनवेल, गाव भेरले येथे स्थित मोजमापीत सुमारे २,३६,९८० चौरस मिटर्स म्हणजेच ५८.५५ एकर या मोठया जमिनीपैकी गट क्र. १५६/२/ए (पुर्वीचा गट क्र. १५६/२/ए/२९ आणि जुना सर्व्हे क्र. ३१ आणि दळी प्लॉट क्र. २९ शी संबंधित) असलेला मोजमापीत २,३४,४८० चौरस मिटर्स म्हणजेच ५७.९४ एकर जमिनीचा तो सर्व तुकडा आणि खंड. जमिनीच्या चर्तु:सीमा खालिलप्रमाणे आहेत:

उत्तरेकडे वा त्या दिशेला : वेलाबेल मालमत्ता
दक्षिणेकडे वा त्या दिशेला : जन्नाभाई केशवाव पाटील यांची जमीन
पूर्वेकडे वा त्या दिशेला : वाधवा वाईस सीटी
पश्चिमेकडे वा त्या दिशेला : मोहापे रेल्वे स्टेशन

आज दिनांक ०४ फेब्रुवारी २०२४

**खैतान ॲन्ड कंपनी करीता**
**सही /-**
**अमित एच वाधवानी**
**भागीदार**

# मनमोहन... भूमिका छोट्याच, प्रभाव मोठा!









तुम्हाला शक्ती सामंता निर्मित व दिग्दर्शित आराधना (१९६९) सुपरहिट गाण्यांसह अनेक गोष्टींसाठी सहज आठवत असेलच, त्यात एका प्रसंगात श्याम (मनमोहन) अतिशय दुष्ट हेतूने, विखारी नजरेने, पापी लालसेने वंदनाच्या (शर्मिला टागोर) घरी येतो आणि जालीमपणे म्हणतो, जो लडकी मुझे थप्पड मारती है, मै उसे बुरा नही मानता, उसका नाम डायरी मे नोट कर देता हू...एक दिन हिसाब किताब पुरा कर देता हू...असं म्हणतच तो वंदनावर जबरदस्ती करू लागतो. यात झटपट वाढते आणि अशातच वंदनाचा मुलगा शाळेतून येतो आणि खिडकी तोडलेल्या काचेने श्यामवर हल्ला करतो. पापी श्याम अतिशय जखमी झाल्याने त्यात त्याचा मृत्यू होतो.

तुम्हाला शक्ती सामंतांच्याच अमर प्रेम (१९७२)मधील पुष्पा (शर्मिला टागोर) कोठ्यावरची गायिका का बनते हे कथेच्या ओघात समजते. ती आपल्या दारूच्या अतिशय व्यसनी गेलेल्या पतीपासून वेगळी राहत असते. अखेरीला कळते आपला हा दारुच्या आहारी गेलेला नवरा अतिशय आजारी आहे आणि त्यातच त्याचा अंत होतो. पुष्पाच्या या नवऱ्याची म्हणजेच राम रतनची भूमिका साकारलीय मनमोहनने. मनमोहनची ही छोटी भूमिकाही उल्लेखनीय ठरली.

तुम्हाला हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'नमक हराम'(१९७३)मधील सोमू अथवा चंदर (राजेश खन्ना) आणि विकीच्या (अमिताभ बच्चन) जिगरी दोस्तीची गोष्ट चांगलीच ज्ञात आहे. त्यात विकीचे उद्योगपती वडील दामोदर महाराज (ओम शिवपुरी) अतिशय चलाखीने विघ्न घालतात. ते चंदर कामात मग्न असतानाच आपला खबरी अथवा चमचा जयसिंग (मनमोहन) याला मुद्दाम पाठवतात आणि जयसिंग इतर कामगारांना ऐकू जाईल, समजेल अशा पध्दतीने चंदरला म्हणतो, साब ने मिलने बुलाया है... एवढ्यावरून चंदरबद्दल गैरसमज निर्माण होतात. त्याला मालिक का चमचा समजतात आणि बेदम मारहाणही करतात. हे सगळे जयसिंगमुळे झाल्याचे विकीला समजल्यावर विकी त्याला बेदम मारहाण करीत वस्तुस्थिती समजून घेतो आणि सत्य माहित पडल्यावर जयसिंगला पैसे देत असतानाच जयसिंग म्हणतो, नही साब नही... जिंदगी मे पहली बार इमानदारी का काम किया है...पैसे नहीं लूंगा.

चित्रपट रसिकांच्या वयाच्या साठीपारच्या एका पिढीच्या डोळ्यासमोर साठ आणि सत्तरच्या दशकात तब्बल शंभरपेक्षा जास्त चित्रपटात छोट्या छोट्या भूमिकेतही चांगलाच लक्षात राहिलेला मनमोहन आठवला असेल. त्या काळातील अनेक चित्रपटांत सत्येन कप्पू, शेट्टी, मनमोहन, मॅकमोहन असे अनेक कलाकार छोट्या छोट्या भूमिकेत दिसत. नव्वदच्या दशकातील चित्रपट रसिकांना बोल राधा बोल, महासंग्राम, शूल, लाडला, लव्ह के लिए कुछ भी करेगा, इना मिना डिका इत्यादी चित्रपटांचा निर्माता नीतिन मनमोहन माहित असेल. मनमोहन त्याचे पिता. खरं तर नीतिन पंचमिया या नाव आडनावाने 'बात बन जाऐ' या चित्रपटातून निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकले तेव्हा त्याला काहींनी सांगितले, या पंचमिया आडनावावरून तुला कोण ओळखणार? त्यापेक्षा तुझ्या नावापुढे तुझ्या वडिलांचे नाव लाव, नीतिन मनमोहन. तुला चित्रपटसृष्टीत आणि चित्रपट रसिकांत ओळख मिळेल. हा सल्ला उपयुक्त ठरला. मनमोहन या नावाला निश्चितच ओळख व वलय होतेच.

मनमोहनचा जन्म २८ जानेवारी १९३३ चा. बिहारमधील जमशेदपूर या छोट्या शहरात एका चांगल्या व्यापारी कुटुंबात झाला. हे चार भाऊ. आई गृहिणी. वडिलांची इच्छा चारही मुलांनी व्यवसायात रस घ्यावा. तसा तो तिघांनी घेतला. मनमोहनला मात्र चित्रपट एन्जॉय करण्याची हौस मौज. त्यालाही वाटे, 'आपणही हीरो बनूयात'. पण कसा मार्ग काढणार? स्वप्न तर होते, पण काय करायचे हा प्रश्न होता. अशातच मारुती, मुकरी आणि टूनटून हे कॉमेडीयन एका शोसाठी जमशेदपूर येथे आल्याची संधी साधून मनमोहनने त्यांची दोन दिवस उत्तम मेहमान नवाझी केल्याचे त्याच्या पथ्यावर पडले. ते मनमोहनला म्हणाले, सिनेमात काम करू इच्छितोय तर मुंबईत यायला हवे. मनमोहन आला तर खरा पण एकेक संधी मिळणे अवघड होते. आर. के. नय्यर यांच्या 'यह रास्ते है प्यार के' (१९६३) या चित्रपटात अगदीच छोटीशी भूमिका मिळाली. 'जिंदगी और मौत' याही चित्रपटात एक प्रसंग साकारला. मनमोहनला हीरो बनायचे वेध आणि वेड होते, पण ते फार अवघड आहे हे त्याच्या लक्षात आले. संधीसाठी फिल्मवाल्यांच्या भेटीगाठी घेत असतानाच त्याच्या काही ओळखी झाल्या आणि तो 'यारों का यार' अशा दिलखुलास वृत्तीने वावरत असल्याने त्या ओळखी घट्ट होत गेल्या. त्यात एक होते संगीतकार जयकिशन (शंकर यांचे जोडीदार) त्यांनी निर्माते केवल कश्यप यांच्याशी मनमोहन यांची भेट करुन दिली. केवल कश्यप तेव्हा एस. राम शर्मा दिग्दर्शित 'शहीद' (१९६५) या देशभक्तीपर चित्रपटाची निर्मिती करीत होते. मनोजकुमार भगतसिंग साकारत होता. प्रेम चोप्रा सुखदेवच्या भूमिकेत होता. त्याचाही तो सुरुवातीचा काळ. मनमोहनने चंद्रशेखर आझाद साकारला. चित्रपट जोशपूर्ण असल्याने सगळ्यानीच अतिशय आत्मियतेने काम केले. चित्रपट लोकप्रिय ठरला. चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला. चित्रपटाची संपूर्ण टीम नवी दिल्लीत गेली आणि तत्कालिक पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या हस्ते त्यांनी हा मानाचा पुरस्कार स्वीकारला. पंतप्रधानांनी मनोजकुमारला सल्ला दिला, आपल्या देशाचे बोधवाक्य 'जय जवान जय किसान' यावर चित्रपट निर्माण कर. दिल्ली ते मुंबई रेल्वे प्रवासात मनोजकुमारने 'उपकार' या चित्रपटाची रुपरेषा तयार केली आणि त्यात 'शहीद'मधील आपले सहकारी प्रेम चोप्रा, मनमोहन यांनाही आवर्जून संधी दिली. मनमोहन त्याच्या प्रत्येक चित्रपटात हुकमी ठरला.

मनमोहन आता चित्रपटसृष्टीत अधिकाधिक प्रमाणात माहित होत जाताना त्याला अनेक चित्रपटांत लहान मोठ्या भूमिका मिळू लागल्या. काही वर्षातच त्याच्या लक्षात आले आपल्याला लहान मोठा खलनायक साकारत वाटचाल करावी लागेल. त्याचं व्यक्तिमत्व, त्याची नजर व्हीलनगिरीला सही होती. मनमोहनची कारकीर्द सुरू होत असतानाच प्राण खौपनाक खलनायकीकडून चरित्र भूमिकेकडे वळला होत आणि नेमके तेव्हाच अजित, प्रेमनाथ हे नायकाकडून खलनायक झाले. के. एन. सिंग, जीवन, मदन पुरी, अन्वर हुसैन यांचा जम बसला होता. प्रेम चोप्रा जम बसवत होताच. अशातच रणजीत, डॅनी डेन्झोपा, नरेन्द्रनाथ, रुपेशकुमार, मॅकमोहन, इम्तियाज, भरत कपूर, सुधीर असे आणखीन लहान मोठे व्हीलन आले. रमेश देवही काही हिंदी चित्रपटात व्हीलन साकारत. विनोद खन्ना व शत्रुघ्न सिन्हा यांनीही खलनायक म्हणून करियर सुरू करून मग ते नायक झाले. मनमोहनसमोर चांगलीच स्पर्धा होती. मग गब्बरसिंग अमजद खानही आला. अमरीश पुरीही आला. छोट्या भूमिकेत सुरुवात केलेला मनमोहन या सगळ्या वातावरणात छोट्या भूमिकेतच राहिला. त्यातून सुटका नव्हतीच. एकाद्याची कारकीर्द अशीही घडते.

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

मनमोहनची चित्रपटांची संख्या वाढत होती आणि त्यात सातत्य होते ही समाधानाची बाब. साठच्या दशकातील जानवर, गुमनाम, मेरा साया, परीवार, नौनिहाल, आराधना, विश्वास, सत्यकाम, प्यार ही प्यार, दो भाई, पूरब और पश्चिम अशा अनेक चित्रपटांतून त्याने सत्तरच्या दशकातही उत्तम सातत्य ठेवले. प्रेम पुजारी, हमजोली, नया जमाना, मेरा गांव मेरा देश, बॉम्बे टू गोवा, ललकार, शोर, राजा रानी, डबल क्रॉस, अनहोनी, जुगनू, शंकरदादा, हीरा पन्ना, अनोखी अदा, गीता मेरा नाम, प्रेम नगर, रोटी कपडा और मकान, हमशकल, आंधी, अमानुष, महाचोर, बारुद, छैला बाबू, चलता पूर्जा, हत्यारा अशा अनेक चित्रपटांत त्याने भूमिका साकारली. त्यात एक चित्रपट होता, मनू नारंग निर्मित व बिमल रावत दिग्दर्शित 'पांच के दुश्मन' (१९७३). विनोद खन्ना, शत्रुघ्न सिन्हा, अजित, प्राण आणि प्रेम चोप्रा हे ते पांच. या चित्रपटात मनमोहनही होता. पिक्चर रिलीज झाला तोच फ्लॉप. तरी विशेष उल्लेखनीय गोष्ट, दहा वर्षांनंतर म्हणजेच १९८३ साली हाच चित्रपट तेव्हाच्या नियमानुसार पुन्हा सेन्सॉर संमत करून घेताना त्याचे नाव 'दौलत के दुश्मन' असे करुन तो चांगल्या पूर्वप्रसिध्दीने पुन्हा प्रदर्शित करण्यात आला. अशाही रंजक गोष्टी होत असतात. मनमोहनने बंगाली, गुजराती, पंजाबी या भाषेतील चित्रपटातही भूमिका साकारत आपला कार्यविस्तार वाढवला. मनोजकुमार, राजेश खन्ना, शक्ती सामंता यांचा तो विशेष आवडता होता.

असे सगळे सुरू असतानाच मनोजकुमारसोबत 'संतोष' या चित्रपटात मनमोहन भूमिका साकारत होता. महाराष्ट्रातील एका गावात याचे शूटिंग असताना त्या गावात विजेची सोय नव्हती. म्हणून प्रेट्रोमॅक्स लावून युनिट झोपत असे. अशातच एका रात्री पेट्रोमॅक्स फुटला आणि तेथून जवळच झोपलेला असलेला मनमोहन ऐंशी टक्के भाजला. हा अपघात जणू आघात ठरला. बरेच दिवस उपचार सुरु होते. त्यातून सावरतच मनमोहन पुढील उपचारासाठी जमशेटपूरला गेला आणि तेथेच त्याचे २६ ऑगस्ट १९७९ रोजी निधन झाले. तेव्हा त्याचे वय फक्त ४६ वर्ष इतके होते. हा अचानक झालेला 'द एण्ड' होता.

मनमोहनच्या आयुष्याचा शेवट फारच धक्कादायक ठरला.. पण आराधना, अमर प्रेम, नमक हराम अशा चित्रपटांतील त्याच्या भूमिका लक्षात राहतील. त्याच्या मृत्यूनंतर त्याची भूमिका असलेला मनोजकुमार निर्मित व दिग्दर्शित 'क्रांती' प्रदर्शित झाला.'जान ए वफा' (१९९०) अनेक वर्ष रखडत रखडत एकदाचा पडद्यावर आला तोपर्यंत मनमोहनचा मुलगा नीतिन मनमोहन चित्रपटसृष्टीत कार्यरत झाला होता. (कालांतराने त्याचेही २९ डिसेंबर २०२२ रोजी निधन झाले. तेव्हा डोळ्यासमोर मनमोहनही आला.)

# नॅक मूल्यांकन पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल...

देशामध्ये पुढच्या वर्षापासून (जून २०२४ पासून) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० लागू होत आहेत त्यानुसार भारत सरकारने २०३७ पर्यंत उच्च शिक्षणाचा जीआर ५० टक्क्यांपर्यंत साध्य करण्याचे निश्चित केले आहे याचा प्रमुख उद्देश देशातील अग्रगण्य संस्थांनी जागतिक स्तरावर आपला ठसा उमठावा अशी अपेक्षा आहे तसेच ते बदल आपल्याला येणाऱ्या काळामध्ये दिसतील.

देशातील शिक्षण संस्थाचे मूल्यांकन व मानांकन करणारी संस्था म्हणजे नॅक, बेंगलोर यांच्याकडून नामांकित प्रक्रियेमध्ये परिवर्तनात्मक सुधारणा करण्यात आल्या आहेत. शिक्षण क्षेत्रातील जानकर मंडळीं व शिक्षणतज्ञ यांच्यामध्ये सध्या अस्तित्वात असलेली नामांकन पद्धतीवर बरेच प्रश्न उपस्थित केले जात होते म्हणून ही पद्धत काहीशी वादग्रस्त ठरली होती. त्यामुळे नॅक बेंगलोर यांच्याकडून इस्रोचे माजी चेअरमन डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली नोव्हेंबर २०२० रोजी एक समिती स्थापन करून नवीन नँक मूल्यांकन व नामांकन पद्धती तयार करण्याचे काम सुरू केले होते त्यानुसार समितीने त्यांचा अहवाल १६ जानेवारी २०२४ रोजी भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाकडे सुपूर्द केला व केंद्रीय शिक्षण मंत्री मा. धर्मेंद्र प्रधान यांनी मंजुरी दिली. नव्याने येणारी मांनाकन व मूल्यांकन पद्धती ही प्रामुख्याने तीन बाबीवर आधारित आहे:


**१. द्विस्तरीय मूल्यांकन (बायनरी पद्धती) :** महाविद्यालय व विद्यापीठे यांचे नॅकचे मांनाकन व झाले अथवा नाही एवढेच मर्यादित असेल. यामध्ये जुन्या पद्धतीने देण्यात येणारी मानांकन श्रेणी बंद करण्यात आली आहे. जागतिक स्तरावरील अनेक अग्रगण्य संस्थांचा अभ्यास करून ही पद्धती तयार करण्यात आली आहे. या पद्धतीमुळे देशातील अग्रगण्य संस्थांमधील असणारी नॅक श्रेणी प्राप्त करण्यात येणारी शर्यत आता संपली आहे.

**२. परिपक्वतेवर आधारित मूल्यांकन (मॅच्युरिटी बेस्ड मूल्यांकन) :** महाविद्यालयांचा विकासाचा आलेख उंचावण्यासाठी ज्या महाविद्यालयाचे नॅक मानांकन झाले असेल असे त्यांना लेवल १ ते ४ असे राष्ट्रीय उत्कृष्ट संस्था (इन्स्टिट्यूशन्स ऑफ नॅशनल एक्सलन्स) या अंतर्गत समावेश करण्यात येणार आहे. त्याचबरोबर सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांना केवल ५ म्हणजे आंतरराष्ट्रीय उत्कृष्ट संस्था (इन्स्टिट्यूशन्स ऑफ ग्लोबल एक्सलन्स) या वर्गामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे. यामुळे भारतीय उच्च शिक्षण संस्थाना जागतिक स्तरावर ओळख निर्माण करून इतर अग्रगण्य संस्थांमध्ये स्थान निर्माण करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

**३. एक देश एकत्र माहिती संकलन पद्धती (वन नेशन वन डेटा प्लॅटफॉर्म) :** उच्च शिक्षण संस्था कडील माहिती अखंडित व त्यामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी एक देश एकत्र माहिती संकलन पद्धती अवलंबण्यात आली आहे. ही उपलब्ध माहिती विविध उद्देशासाठी म्हणजे उच्च शिक्षण संस्थाची मान्यता, मानांकन तसेच राष्ट्रीय स्तरावरील रँकिंग साठी वापरली जाईल. त्याचबरोबर उच्च शिक्षण संस्थाचे भागदारक त्यामध्ये प्रामुख्याने आजी, माजी विद्यार्थी, पालक इंडस्ट्रीज, अनुदान देणाऱ्या विविध संस्था इ. यांचे मत विचारात घेतली जानार आहे. प्रास्ताविक बदल हे दोन टप्प्यांमध्ये अस्तित्वात येणार आहे. जून २०२४ पासून द्विपद्धती देशभरामध्ये लागू होईल त्यानंतर डिसेंबर २०२४पासून परिपक्वतेवर आधारित मूल्यांकन अस्तित्वात येईल.

**-प्रा. डॉ. महादेव चव्हाण**
सहाय्यक प्राध्यापक, रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, खारघर

# आज जागतिक कर्करोग दिन




कर्करोगाविषयी जनजागृती करण्याकरिता ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून साजरा केला जातो. कर्करोगाबाबत माहितीचा प्रसार करणे आणि कर्करोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्रोत्साहन देणे हे जागतिक कर्करोग दिवस साजरा करण्यामागील उद्दिष्ट आहे.

पॅरिस येथे सन २००० मध्ये झालेल्या जागतिक परिषदेत कर्करोगविषयक मसुदा मांडण्यात आला. अशा प्रकारचा विषय हाताळणारी ही पहिलीच परिषद ठरली. या परिषदेत जगभरातील शासकीय उच्चपदस्थ अधिकारी आणि कर्करोगविषयक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी पॅरिसच्या कर्करोगविषयक सनदेला मान्यता दिली. प्रस्तुत सनद कर्करोगसंबंधित संशोधन आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याकरिता आर्थिक गुंतवणूक करणे, कर्करोगग्रस्त रूग्णांचे जीवनमूल्य उंचावणे तसेच त्यांना योग्य उपचार देणे अशा तत्त्वांचा पुरस्कार करते. सनदेच्या दहाव्या कलमात अधिकृतरीत्या ४ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक कर्करोग दिवस' म्हणून जाहीर केला गेला.

कर्करोगविषयक उपलब्ध माहिती तसेच कर्करोगाचे निदान आणि उपचार यांत झालेली लक्षणीय प्रगती यांमुळे रोगप्रसारामध्ये कपात होणे अपेक्षित आहे. परंतु जागतिक आकडेवारीनुसार दरवर्षी कर्करोगाचे नव्याने निदान होणाऱ्या रूग्णांच्या संख्येत भर पडत आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, कर्करोगाच्या माहितीचा प्रसार करून कर्करोगाने होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करता येऊ शकते. यासाठी कर्करोग प्रतिबंधात्मक उपायांविषयी जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने जगभरातील कर्करोग संस्था आणि आरोग्य संघटना जागतिक कर्करोग दिवस साजरा करतात.

कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी सु. ७० % मृत्यू हे अल्पविकसित देशांमध्ये होत असल्याकारणाने अशा ठिकाणी कर्करोग आणि त्याचा प्रतिबंध याबद्दल जनजागृती करण्यासाठी जागतिक कर्करोग दिवस हे एक महत्त्वाचे साधन आहे.

आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना (Union for International Cancer Control, UICC) ही संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर कर्करोगावर नियंत्रण राखण्यासाठी आणि पर्यायाने जागतिक आरोग्य सुधारण्यासाठी कार्यशील असते. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना, जागतिक आरोग्य संघटना आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कर्करोग दिवसाचे आयोजन केले जाते. प्रत्येक वर्षी आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना जागतिक कर्करोग दिवसानिमित्त कर्करोगाशी निगडित रूपरेखा (थीम) जाहीर करते. या रूपरेखेला अनुसरून विविध आरोग्य संस्था आणि कर्करोग उपचार केंद्र यांद्वारे शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. या संस्थांद्वारे त्यांच्या संकेतस्थळांवर कर्करोगाविषयी माहिती प्रसारित केली जाते.

आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना स्थानिक आरोग्य संस्थांच्या साहाय्याने संमेलने, व्याख्याने, प्रदर्शने तसेच निधी उभारणी कार्यक्रम यांचे आयोजन केले जाते. काही देशांमध्ये आकाशवाणी आणि दूरदर्शन या माध्यमांद्वारे ४ फेब्रुवारी किंवा त्या आठवड्यात कर्करोगविषयक विशेष कार्यक्रम प्रसारित केले जातात.

जागतिक कर्करोग दिवसानिमित्त सामूहिक आणि वैयक्तिक प्रयत्नांतून कर्करोगाचा जनजीवनावरील परिणाम कमी करता येऊ शकतो (We can, I can) या आशयाशी संलग्न रूपरेखा आखण्यात आली (२०१६-१८). तसेच कर्करोगाबाबत गैरसमज दूर करणे (Cancer myths - Get the Facts); कर्करोग हा प्रतिबंधात्मक आजार आहे (Cancer can be prevented); कर्करोगाविषयी वैयक्तिक बांधीलकी (I Am and I Will) अशा विविध विषयांना अनुसरूनदेखील रूपरेखा योजण्यात येतात. भारतामध्ये सन २०१४पासून ७ नोव्हेंबर या दिवशी राष्ट्रीय कर्करोग जनजागृती दिवस साजरा करण्यात येतो.

# शास्त्रीय गायक स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी



संगीत ही मानवाला मिळालेली महत्वपूर्ण देणगी आहे. त्यातून माणसाच्या भावभावना, इच्छा, जीवनात आलं; आलेले नैराश्य या सर्व गोष्टीवर मत करता येऊ शकते. भारतीय संगीत परंपरेत अनेक कलाकारांचा मोठा वाट दिसून येतो. त्या वेळी आणि आजही संगीत हेच आपले जीवन मानणाऱ्या कलाकारांची भारतात कमतरता दिसत नाही. भीमसेन जोशी जन्म ४ फेब्रुवारी १९२२ कर्नाटक येथील गदग याठिकाणी झाला.

भीमसेनजींचे वडील पेशाने शिक्षक होते. त्यामुळे भीमसेनजींचा संगीताकडे असणारा कल त्यांना आवडत नसे. त्यामुळे कालांतराने आपली आवड जोपासण्यासाठी घर सोडावे लागले. त्यांनी पुढे उत्तर भारतात जाऊन उस्ताद अब्दुल करीमखाँ, वझेबुवा, केसरबाई केरकर या सारख्या अन्य उस्तादांकडे त्यांनी गायन-वादन शिकून घेतले. घरी आल्यानंतर त्यांच्या वडीलांनी संगीताचा ओढा लक्षात घेऊन कुंदगोळ गावातील रामभाऊ कुंदगोळ यांच्याकडे शिकवणी चालू केली. रामभाऊ सवाई गंधर्व होते. त्यामुळे शास्त्रीय संगीत शिकवण्याकडे अधिक भर होता.पुढे त्यांनी लवकरच पुण्यातील हिराबागेत आपली पहिली संगीत मैफिल भरवली. विमान प्रवासांमुळे, त्यांना पु.ल. देशपांडे यांनी गमतीने 'हवाईगंधर्व' ही पदवी बहाल केली होती. कित्येक वेळा एकाच दिवसात दोन शहरांतील मैफली घेण्यासाठी ते दोनदा विमानप्रवास करीत असत. भीमसेन जोशींना हिंदुस्थानी शास्त्रीय गायन पद्धतीचे ख्याल गायक म्हणत असले तरी त्यांनी १९४० च्या दशकात लखनौ मध्ये एक वर्ष राहून तेथील प्रसिद्ध गायकांकडून ठुमरी शिकून घेतली होती.

आपल्या गुरूच्या स्मरणार्थ त्यांनी १९५२ सालापासून सवाई गंधर्व संगीत महोत्सव सुरू केला होता. भीमसेन जोशींनी सुरुवात जरी जाऊन केली होती तरीही त्यांना प्रत्येक गायनाचा प्रकार आवडायचा. त्यामुळे जयपूर येथील गंधर्व महाविद्यालयाने संगीताचार्य हि पदवी बहाल केली भारतात शास्त्रीय गायनाच्या हिंदुस्थानी आणि कर्नाटकी या दोन प्रमुख शाखा मानल्या जातात. भीमसेन जोशींचे वैशिष्ट्य असे की ते दक्षिण भारत प्रचलित असलेल्या कर्नाटकी गायनातल्या चीजा हिंदुस्थानी पद्धतीने गाऊन दाखवीत.

पंडितजीनी आपल्या आयुष्यात सर्वात जास्त प्रेम केलं असेल तर ते फक्त गायनावर. त्यांनी विविध संगीत मैफिलीतून संगीताला चालना दिली. त्यांनी केलेल्या संगीतसेवेमुळे भारतीय शास्त्रीय संगीतात पंडित भीमसेन जोशींचे स्थान अजरामर झाले आहे. महाराष्ट्र सरकार दरवर्षी भीमसेन जोशी यांच्या नावाचा 'भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार देते. आतापर्यंत हा पुरस्कार किशोरी आमोणकर, पंडित जसराज यांना मिळाला आहे. या महान गायकाचे २४ जानेवारी २०११ रोजी पुणे येथे वयाच्या ८८व्या वर्षी देहावसान झाले.

**-गोकुळ पवार**

# हवेत गारठा वाढल्याने मासळी गायब

## मच्छीमार बांधव आर्थिक संकटात; खवय्यांचे झाले वांदे





**रायगड : रामप्रहर वृत्त**

अनेक दिवसांपासून वातावरणात गारठा वाढला असून समुद्रातील तापमानही कमी झाल्याने खोल समुद्रातील मासळीही गारठली आहे. त्यामुळे मासळीची ४० टक्केपेक्षा अधिक आवक घटली आहे.

परिणामी मासळीच्या दरातही वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे खवय्यांबरोबर मच्छीमारही आर्थिक संकटात सापडले आहेत. प्रत्येक बदलत्या वातावरणाचा मासेमारी व्यवसायावर परिणाम होतो. त्यानुसार सध्या वातावरणातील गारव्यामुळे उष्णतेच्या शोधात मासे समुद्राच्या तळाला जाऊ लागले आहेत. त्यामुळे मासेमारीसाठी गेलेल्या बोटींना आवश्यक त्या प्रमाणात मासळी मिळत नसल्याने मच्छीमारांनी केलेला खर्चही निघत नसल्याने नुकसान सहन करावे लागत आहे. यावर्षी थंडीचे प्रमाण वाढल्याने पुन्हा एकदा मच्छीमारांवर संकट आले आहे.

खोल समुद्रातील मासेमारीच्या एका फेरीसाठी तीन ते साडेतीन लाख रुपयांचा खर्च येतो, मात्र सध्या मासळीचे प्रमाण कमी झाल्याने मच्छीमारांना मिळणारी आठ ते १० टनांची मासळी आता तीनपेक्षा कमी टनांवर आली आहे. त्यामुळे यासाठी करण्यात आलेला खर्चही निघत नाही. ही स्थिती काही दिवस राहिल अशी माहिती मच्छीमारांनी दिली आहे.

### विविध प्रजातींचे मासे मिळेनात

*समुद्रातील वाढते प्रदूषण आणि अनधिकृतपणे सुरू असलेल्या बेसुमार मासेमारीच्या परिणामी समुद्रात मिळणारे अनेक प्रकारचे मासे गायब होऊ लागले आहेत. पापलेट, सुरमई, घोळ आणि इतर अनेक प्रजातीचे मासे मिळेनासे झाले आहेत.*

कोळंबी प्रकारात टायनी १०० रुपयांवरून २०० रु., चैनी २००वरून ३५० रु., सफेद कोळंबी १५० वरून २५० रु., मांदेली आणि बोंबील हे सर्वसामान्य खवय्यांच्या पसंतीचे व परवडणारे मासेही महाग झाले आहेत. त्याचा परिणाम मासळीच्या दरवाढीवर झाला आहे.

# रोह्यातील ७०० नागरिकांना आयुष्यमान भारत कार्ड

## भाजपचे रोशन चाफेकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**धाटाव : प्रतिनिधी**

भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगडचे जिल्हा सरचिटणीस संस्थापक रोशन चाफेकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयुष्यमान भारत व उद्यम कार्ड शिबिर राबविण्यात आले होते. ७०० नागरिकांना या योजनेंतर्गत गुरुवारी (दि. १) कार्ड वाटप करण्यात आले.



कार्यक्रम भाजप रायगड लोकसभा प्रमुख सतीश धारप, दक्षिण रायगड भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाने तसेच रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या सहकार्याने पार पडला.

या वेळी रायगड लोकसभा विस्तारप्रमुख रमेश ढेबे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर, तालुका भाजप उपाध्यक्ष रवींद्र तारू, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस जयश्री भांड, तालुका महिला मोर्चा अध्यक्ष अपर्णा सुटे, कामगार आघाडी नेते विलास डाके, निलेश धुमाळ, सनील इंगावले, ज्योती सनलकुमार, धनश्री बापट, मिलिंद झुरे, विज्ञान सर, रोहा प्रेस क्लब माजी अध्यक्ष राजेंद्र जाधव, रवींद्र कान्हेकर, सचिन साळुंके, महेंद्र मोरे, उद्धव आव्हाड, संतोष सातपुते, जितेंद्र जाधव, रामनरेश कुशवाह, संजय गायकवाड, माजी नगरसेवक महेश कोल्हटकर, मयूर दिवेकर, रोठ बुद्रुक ग्रामपंचायत सदस्या वैभवी भगत, राजेश भगत, सुराज्य प्रतिष्ठान अध्यक्ष किरण कानडे, सचिव हाजी कोठारी, राष्ट्रवादी विद्यार्थी जिल्हा सरचिटणीस विनीत वाकडे, भाजप महिला जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, रोहा सिटी फ्लॉवरचे सुरेंद्र निंबाळकर, सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ केंडे, रवींद्र बावदाने, संदेश विचारे, शिवव्याख्याते प्रतिक पाटणकर उपस्थित होते.

आगामी काळात विविध योजना आम्ही घेऊन येणार आहोत व हा वाढदिवस माझ्या जीवनातील महत्त्वाचा क्षण ठरला, अशा भावना रोशन चाफेकर यांनी व्यक्त केल्या.

# पुणे-कर्जत शटलसेवा सुरू करावी; आमदार महेंद्र थोरवे यांचे निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**

पुण्याहून कर्जतला येण्याकरिता तब्बल साडेसात तास एकही गाडी नसल्यामुळे आमदार महेंद्र थोरवे यांनी एक निवेदन पाठवून मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांकडे दिले आहे.

कर्जतकरांसाठी काही गाड्या थांबवून सोय करावी अशी विनंती त्यांनी केली आहे. मला नाईलाजाने ठिय्या आंदोलन किंवा रेल रोको करायला लावू नका, असा इशारा त्यांनी दिला आहे.

पुण्याहून सकाळी ७.५०वा. ची प्रगती एक्सप्रेस गेल्यानंतर दुपारी ३.१५ वा. पुणे-मुंबई डेक्कन एक्स्प्रेस आहे. म्हणजेच पुण्याहून सकाळी ७.५० ते दुपारी ३.१५ दरम्यान पुण्याहून कर्जतला येण्याकरिता एकही गाडी नसल्याने प्रवाशांना त्रास होत आहे. पूर्वी हैदराबाद एक्स्प्रेस कर्जतला थांबत असल्यामुळे व पुणे भुसावळ गाडी असल्यामुळे तसेच पुणे-कर्जत शटल सेवा असल्यामुळे प्रवाशांची चांगली सोय होत होती, परंतु वरील तिन्ही गाड्यांचा कर्जतला थांबा नाही. यातील काही गाड्या दुसरीकडे वळण्यात आले आहेत, तर काही गाड्यांचे थांबे रद्द केले आहेत. त्यामुळे कर्जतकरांमध्ये नाराजी पसरली गेली आहे. पुण्याहून कर्जतला येण्याकरीता सुमारे साडेसात तास गाडी नसल्यामुळे आमदार महेंद्र थोरवे यांनी लक्ष असून रेल्वे प्रशासनास विनंती केली आहे. याबाबतीत त्वरित काहीतरी मार्ग काढून काही गाड्या ज्या कर्जत मार्गाने जातात, पण थांबत नाही त्या गाड्यांना कर्जातला थांबा द्यावा, अशी मागणी केली आहे.




आमदार महेंद्र थोरवे यांनी सदर निवेदनात असेही म्हटले आहे की, या वेळमध्ये कर्जतसाठी गाड्या थांबवा. या बाबतीत मला नाईलाजाने कर्जत रेल्वेस्थानकात ठिय्या आंदोलन किंवा रेल रोको करावे लागू नये, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

**ही समस्या दूर करण्याकरिता रेल्वे प्रशासनाने हैदराबाद एक्स्प्रेस या गाडीचा कर्जतला थांबा पुन्हा सुरू करावा तसेच भुसावळ-पुणे ही गाडी पुन्हा कर्जतमार्गे सोडण्यात यावी. पुणे-कर्जत शटल सेवा ही सुरू करण्यात यावी.**

**-पंकज ओसवाल, सामाजिक कार्यकर्ते, कर्जत**


### शुद्धीपत्रक

दिनांक ०३/०२/२०२४ रोजी प्रसिध्द झालेल्या पनवेल महानगरपालिकेच्या पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरातीमध्ये मराठी माध्यम पदामध्ये ९ आकडा चुकीने छापला गेला आहे. त्याऐवजी तो आकडा १ असा वाचावा.

**एकूण पदे- ९ ऐवजी १ असे वाचावे**


# शत्रुच्याही मनात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आदर -यशवंत गोसावी

**चौक : प्रतिनिधी**

शत्रुच्या ही मनात आदर असणारा जगातील एकमेव राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. येथील मातीला छत्रपती शिवाजी महाराजांचा स्पर्श झाला आहे. या पावनभूमीत जन्माला येणे भाग्याचे आहे, असे गौरवोद्‌गार शिवव्याख्याते यशवंत गोसावी यांनी काढले.



खालापूर तालुक्यात असलेल्या समरभूमी उंबरखिंड रणसंग्राम विजयी दिनाच्या ३६३व्या विजयी उत्सवानिमित्त चावणी येथे ग्रामपंचायत चावणी, ग्रामस्थ, पंचायत समिती खालापूर व जिल्हा परिषद रायगड, शिवदुर्ग मित्र मंडळ लोणावळा यांनी आयोजित केलेल्या ऐतिहासिक कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास खालापूर गटविकास अधिकारी संदीप कराड, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, सरपंच बाळू आखाडे, उपसरपंच सुखदेव भोसले, लक्ष्मण घुटे, संगीता चिंचावडे, उषा वाघमारे, प्राची पाटील, सखुबाई वाघमारे, रमेश चव्हाण, ग्रामसेवक अविनाश पिंपळकर, गणेश मोरे, शिवदुर्ग मित्र मंडळ यांचे कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

शिवव्याख्याते यशवंत गोसावी म्हणाले, विद्यार्थ्यांना इतिहास आणि छत्रपती शिवाजी महाराज हे समजणे आवश्यक असून त्यामुळेच पुढची पिढी घडणार आहे. या वेळी शिवशाहीर वैभव घरत यांनी शाहिरी कार्यक्रम आम्ही मराठी ऐतिहासिक पोवाडे व स्फूर्तीगीते सादर करून शिवशाही अवतरवली होती. त्यांच्या पोवड्याने सर्वांच्या अंगात वेगळी ऊर्जा निर्माण झाली होती. परिसरातील शाळांच्या विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक नाट्य सादर केली.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे-दुंदराई, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत श्री. चंद्रकांत रामदास पाटील यांचे कडुन खरेदीखताने कायमस्वरुपी खरेदी करण्याचे योजिले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-दुंदराई, ता. पनवेल, जि. रायगड**

| (जुना) भुमापन आणि उपविभाग क्र | (नवीन) गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| २१/१ | १५/१/२/१ | ०-४९-८ | ६.५६ |

वर नमूद मिळकतीस अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कपंनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न, वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादी द्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचे खरेदीखत व अनुशंगिक दस्त कायदेशिरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

**दिनांक - ०३/०२/२०२४**
**ठिकाण - पनवेल**

**सही/-**
**अॅड. शरद जाधव**
**संपर्कासाठी पत्ता- तळमजला, रॉयल प्राईड बिल्डींग, भूखंड क्र. ११३, मिडल क्लास को. ऑप. हौ. सोसायटी, पनवेल-४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड, मो. ९८२०६३७१७५**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत, १) श्री अनिल पांडुरंग भगत, २) श्री रवींद्र गणपत जोशी व ३) श्री विकास शंकर कोळी, यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून्, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे. मिळकतीचे वर्णन

**मौजे करवले बुद्रुक ता पनवेल जिल्हा रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रुपये |
|---|---|---|---|
| ७० | ३ | ०-४०-०० | १.०४ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबतीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालीत पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. या प्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ०४/०२/२०२४** **सही /-**
**अॅड. वृषाली नायर (पाटील),**
**पत्ता** :- १६. दूरवाणी सी.एच.एस, सेक्टर ६. सी बी डी बेलापूर नवी मुंबई ४००६१४. मोबाईल नं. ९१३७१३३९१८


# जिल्हा सामान्य रुग्णालयात आरओ युनिटचे हस्तांतरण

**रायगड : रामप्रहर वृत्त**

ओवेन्स कोरिंग व युनायटेडवे या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून जिल्हा सामान्य रुग्णालयास देण्यात आलेल्या आरओ युनिटचे हस्तांतरण जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.




या वेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी (घुगे), ओवेन्स कोरिंग व युनायटेडवेचे डिरेक्टर संजय राव, सप्लाय चेनचे लिडर अभिषेक रघुवंशी, फिजिशियन डॉ. भालचंद्र पेंढाबकर, सीएसआर प्रोग्राम कोऑर्डिनेटर धर्मराज प्रधान तसेच संस्थेचे व्हिपी अनिल परमार, प्राची नौटियाल, सिनीअर मॅनेजर डॉ. शैलेश वागळे, एक्झिक्युटीव्ह डॉ. अदिल, प्रभारी अधिसेषवका अनिता भोपी, सर्व वॉर्डच्या इन्चार्ज सिस्टर उपस्थित होत्या.

डॉ. भरत बास्टेवाड यांनी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे व त्यांच्या सक्रीय टीममुळे जिल्हा रुग्णालयाचा कायापालट होत आहे. नावीन्यपूर्ण उपक्रमांकरिता नेहमीच सहकार्य राहील, अशी ग्वाही दिली, तसेच ओवेन्स कोरिंग व युनायटेडवे या सामाजिक संस्थेने दोन आरओ प्लांट हस्तांतरित केल्यामुळे त्यांनी त्यांचे कौतुक केले.

शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने म्हणाले की, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्यामार्फत नियमितपणे आरोग्य विभागातील विविध योजनांचा आढावा घेतला जातो. अडीअडचणी जाणून घेऊन आवश्यक त्या बाबींची पूर्तता जिल्हा स्तरावरून, शासन स्तरावरून अथवा विविध अशासकीय संस्थांमार्फत करण्यासाठी नेहमीच त्यांचे सहकार्य लाभते.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वास्थ्य मार्गदर्शन

**धाटाव : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिकांनी शारीरिक आजार व त्यासाठी घ्यावयाची काळजी या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक मंडळ आणि सेवानिवृत्त संघटनेतर्फे सोमवारी (दि.५) निरोगी स्वास्थ्य मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

ज्येष्ठांचे आहार, विहार, आचार व आयुर्वेद या विषयावर माधवबाग आरोग्य केंद्राचे चेअरमन मिलिंद सरदार उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. ज्येष्ठ नागरिकांना वाढत्या वयोमानानुसार शारीरिक स्वास्थ्य व मानसिकदृष्ट्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. यामुळे रोहा ज्येष्ठ नागरिक मंडळ आणि सेवानिवृत्त संघटना यांचे संयुक्त विद्यमाने सोमवारी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष सरफळे रावसाहेब व सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष मारुती राऊत यांनी केले आहे.


### पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र. पमपा/पापुवि/९९२४/प्र.क्र. ०१/८१/२०२४ दि. ०२/०२/२०२४

#### नागरिकांना जाहीर सुचना

पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडील होणारा पाणी पुरवठा सोमवार दि. ०५/०२/२०२४ सकाळी ९.०० ते मंगळवार दि. ०६/०२/२०२४ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत (२४ तास) बंद राहणार आहे. त्यामुळे शहरामध्ये सदर दिवशी खालीलप्रमाणे पाणी पुरवठा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अ) सोमवार दि. ०५/०२/२०२४ रोजी खालील भागातील पाणी पुरवठा बंद राहील.**
१) चौकोनी टाकीतुन होणारा पाणी पुरवठा, २) मिडल क्लास भाग - १ व २,
३) साईनगर संपूर्ण भाग व ठाणा रोड, ४) एच.ओ.सी. टाकीतुन होणार पाणी पुरवठा,
५) मार्केट यार्ड टाकीतुन होणारा पाणी पुरवठा, ६) भाजी मार्केट टाकीतुन होणारा पाणी पुरवठा,
७) एस्.के. बजाज, लोकमान्य नगर व अंबिका नगर.

**ब) मंगळवार दि. ०६/०२/२०२४ रोजी खालील भागातील पाणी पुरवठा बंद राहील.**
१) पटेल मोहोल्ला, २) शिवाजी नगर, मालधक्का, आझादनगर, नवनाथ नगर झोपडपट्टी, भेंडे बाजु,
३) पायोनिअर सोसायटी, ४) तक्का गांव कॉलनी.
तरी नागरिकांनी मिळणारे पाणी जपुन वापरावे, पाण्याचा अपव्यय करु नये व महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

**सही/-**
**(संजय जगताप)**
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

# नवी मुंबईत श्वानांमुळे नागरिक त्रस्त

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोपरखैरणेत उद्यानांची दुरवस्था ही नित्याचीच बाब झाली आहे, मात्र त्यातही काही उद्याने चांगली असून रोज प्रभात फेरीसाठी लोक येत असतात, मात्र गेल्या काही महिन्यांपासून चारी बाजूंनी सुरक्षित आणि सुरक्षा रक्षक असलेल्या उद्यानात श्वानांचा वावर वाढल्याने डोकेदुखी होत आहे. जॉगिंग करताना अनेकदा कुत्री मागे लागणे, जॉगिंग ट्रॅकवर घाण करणे, अचानक भुंकल्याने दचकणे असे प्रकार होत आहेत.

नवी मुंबईत उद्यानांच्या बाबतीत कोपरखैरणे नोड सर्वांत कमनशिबी आहे. या ठिकाणी सिडकोने उद्यान आणि शेजारीच मैदान असे अनेक निर्माण केलेले आहेत, मात्र त्याची निगा मनपाने एखाद्या वर्षी सलग राखली असे एकही वर्ष नाही, असा दावा नेहमीच कोपरखैरणेवासीय करत असतात. याला अपवाद फक्त शांतिदूत महावीर उद्यान आणि निसर्ग उद्यान यातील शांतिदूत महावीर उद्यानात बाकडे खराब असले तरी जॉगिंगसाठी चांगली सोय आहे. तर निसर्ग उद्यान मुळात जॉगिंग याच उद्देशाने बनवण्यात



आलेले असल्याने तेथेही उत्तम सोय आहे. पावसाळा व्यतिरिक्त दोन्हीकडे मोठ्या प्रमाणात जॉगिंग करणाऱ्यांची गर्दी असल्याने दोन्ही ठिकाणी ओपन जिम आहेत.

निसर्ग उद्यानात सध्या हिवाळा असल्याने लोकांची गर्दी वाढली आहे, मात्र आता इथे येणाऱ्या लोकांना गेल्या काही महिन्यांपासून मोकाट श्वानांचा त्रास होत आहे. त्यात दुर्दैवाने काही श्वानप्रेमी त्यांना बिस्किटे वैगरे पदार्थ देत असल्याने अशा मोकाट श्वानांची गर्दी वाढत आहे. जॉगिंग करताना हे श्वान मागे लागतात. त्यात सकाळी ज्येष्ठ नागरिकांची संख्याही लक्षणीय असते. ज्येष्ठ नागरिक वेगाने चालण्याचा व्यायाम करतात. त्यात अचानक एखादा श्वान भुंकल्याने हे ज्येष्ठ नागरिक दचकतात, अशी प्रतिक्रिया देवेंद्र लोढा यांनी दिली. कोपरखैरणे विभाग अधिकाऱ्यांशी संपर्क साधला मात्र प्रतिसाद मिळाला नाही.

# नवी मुंबई पोलिसांकडून डिजिटल कामकाजावर भर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलीस कामकाजात डिजिटलायझेशनवर भर आहे. हे डिजिटलायझेशन केवळ अंतर्गत कामकाजात नव्हे तर तपास कामातही सुरू केले आहे. आता समन्ससुद्धा पाठवण्यासाठी समाजमाध्यमांचा वापर केला जात आहे. 'आय बाईक', 'यथार्थ' प्रणालीसारखी तपास पद्धत राज्यात पहिल्यांदाच वापरली जात असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. 'एम. पोलीस पद्धती' अर्थात 'मिशन कन्व्हिक्शन' याखाली सर्व पद्धतींचा वापर केला जात आहे. वर्षभरात एकूण गुन्ह्यांच्या ७३ टक्के गुन्हे उकल करण्यात यश आले आहे. तर दोष सिद्धीत २०२२च्या तुलनेत २०२३ मध्ये सहा टक्क्यांनी वाढ झाली आहे.

'इ पेरावी' पद्धतीमध्ये समन्स पाठवण्यासाठी ई-मेल वा समाजमाध्यमाचा वापर केला जातो. २०२३ मध्ये या पद्धतीने ७ हजार ३९७ ई-समन्सद्वारे १९ हजार २४४ साक्षीदारांना समन्स पाठवण्यात आले. यापैकी १४ हजार १०५ साक्षीदार न्यायालयात हजर झाले होते. आय बाईक ही पद्धत सुरू केली. या पद्धतीनुसार गुन्ह्याच्या ठिकाणी पुरावे गोळा करण्यासाठी दुचाकीवर गेलेले प्रशिक्षण घेतलेले एक पथक केवळ पुरावे गोळा करतात. यातील पुराव्याची तपासणी लॅबमध्ये केली जाते. अशा पद्धतीने २०२३ या वर्षात तीन हजार ८८६ गुन्ह्यामध्ये एक हजार ३८ आणि अपमृत्यू मध्ये एक हजार ३८ प्रकरणात १७३ ठिकाणी आय बाईकचा वापर करण्यात आला.



### तपास कामांचा वेग वाढला

सायबर गुन्ह्यांची संख्या पाहता फसवणूक झालेली व्यक्ती केवळ नोंद असावी म्हणून पोलीस ठाण्यात तक्रार देत तपास तर लागणारच नाही या मानसिकतेत पीडित होते, मात्र नेरूळ येथे सायबर पोलीस ठाणे स्थापन केल्यावर तपास कामाचा वेग कमालीचा वाढला. त्यामुळेच तपासकामी आलेल्या गुन्ह्यातील ४३.४५ कोटी फसवणूक रकमेपैकी ३३.८३ कोटी रक्कम गोठवण्यात यश आले.

" नवी मुंबई पोलीस दलाने कात टाकली असून त्याचे आधुनिकीकरण आणि डिजिटलायझेशन केले जात आहे. त्यामुळे वेळ, पैसा, आणि मनुष्यबळाची बचत होत आहे. तपास कामकाज करताना आधुनिक पद्धतीचा वापर सुरू केल्याने गुन्हे उकल, दोष सिद्धीत लक्षणीय वाढ झाली आहे. दोष सिद्धीत वाढ करण्यासाठी सर्व योग्य पद्धतींचा अवलंब केला जाईल.

**-मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई**

# आवक कमी झाल्याने लसूण महागला

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गेल्या आठ महिन्यांपासून घाऊक बाजारात लसणाची आवक कमी होत आहे. मुळातच उत्पादन कमी असल्याने बाजारात कमी प्रमाणात लसूण येत आहे. त्यामुळे लसणाच्या दरात सतत वाढ सुरू आहे. आता ८० ते १०० रुपये किलो असणारा लसूण



घाऊक बाजारात २०० ते ३५० रुपये किलो झाला आहे. त्यामुळे किरकोळ बाजारात लसूण ४०० रुपये किलोच्या घरात गेला आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना लसूण खरेदी करणे कठीण होऊ लागले आहे.

गेल्या आठ महिन्यांपासून लसणाच्या दरात वाढ सुरू झाली आहे. नेहमी ८० ते १०० रुपये किलो असणारा लसणाचा दर १०० रुपये किलोंपासून वाढत आता चक्क ४०० रुपयांच्या घरात पोहचला आहे. त्यामुळे अनेकांच्या घरातून लसूण हद्दपार होऊ लागला आहे. मागील तीन महिन्यांपूर्वी लसणाच्या दरात वाढ झाली होती आणि चांगला लसूण २०० रुपये किलोपर्यंत गेला होता, मात्र आता या आठवड्यात लसणाच्या दराने आणखी उसळी घेतली असून चांगला लसूण घाऊक बाजारातच ३५० रुपये किलोपर्यंत आणि किरकोळ बाजारात ४०० रुपयांवर गेला आहे. हे आतापर्यंतचे सर्वाधिक दर आहेत.

मागच्या दोन वर्षांत लसणाचे दर तुलनेने कमी होते. घाऊक बाजारात लसूण ५० ते ८० रुपये किलोपर्यंत होता. हे लसणाचे सर्वांत कमी दर होते. यातून उत्पादन खर्चही निघत नव्हता, दर पडत असल्याने बहुतांश शेतकऱ्यांनी लसणाचे उत्पादन घेणेच थांबवले होते. मागच्या वर्षभरात बहुतांश शेतकऱ्यांनी लसूणलागवड केलीच नव्हती. त्यामुळे आता बाजारात लसणाची कमतरता जाणवायला लागली आहे. उत्पादन आणि पर्यायाने आवक कमी असल्याने घाऊक बाजारात लसूण ३५० रुपये किलो झाला आहे.

घाऊक बाजारात मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमधून लसूण बाजारात येत आहे. या वर्षीचे पीक यायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे हा नवीन लसूण बाजारात पाहायला मिळत आहे, मात्र लसणाचे दर कमी होण्यास आणखी तीन ते चार महिन्यांचा कालावधी लागणार असल्याचे व्यापारी सांगत आहेत.





**पनवेल : कुलस्वामीनी महिला मंडळ, आकुर्ली यांच्या वतीने श्री सत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील उपस्थित होते. आयोजकांच्या वतीने स्वागत करण्यात आले.**

# वृक्षतोडप्रकरणी चौघांवर गुन्हा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गोठवली गावात राहणाऱ्या एका व्यक्तीने इमारतीच्या बांधकामासाठी १५ ते २० वर्षे जुन्या असलेल्या आठ वृक्षांची बेकायदा कत्तल करण्यात आली आहे. नवी मुंबई महापालिकेने या वृक्षतोडीची गंभीर दखल घेऊन जमीन मालकासह जमिनीवर बांधकाम करणाऱ्या तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

गोठवली गावातील रत्नदीप पार्केलगत असलेल्या १५ ते २० वर्षे जुन्या नारळाची पाच, आंब्याची दोन, जांभळाच्या एका झाडाची बेकायदा कत्तल केल्याची तक्रार ऑगस्ट २०२३ पालिकेच्या उद्यान विभागाकडे केली. या तक्रारीच्या अनुषंगाने पालिकेचे सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी संजय तायडे यांनी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली असता झाडे तोडण्यात आल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी गोठवली गावातील एकाला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती, त्याने महापालिका कार्यालयात कोणताही खुलासा दिलेला नाही. त्यामुळे याप्रकरणी पालिकेने चौघांविरोधात रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

"

**गोठवली गावात बेकायदा वृक्षतोड केल्याप्रकरणी चौघांविरोधात रबाळे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच त्यांनी वृक्षतोड करून त्याठिकाणी सुरू केलेल्या इमारतीच्या बांधकामालासुद्धा नोटीस बजावली आहे.**

**-संजय तायडे, सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, नवी मुंबई महापालिका**

# नवी मुंबईत साडेतीन लाखांहून अधिक कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडील प्राप्त निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण तीन लाख ६० हजार १५० कुटूंबांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे, अशी माहिती नवी मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त शरद पवार यांनी दिली. २३ जानेवारी ते २ फेब्रुवारीपर्यंत हे सर्वेक्षण करण्यात आले.

शासनाच्या वतीने मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गातील कुटुंबांचे सर्वेक्षण करण्याचे काम २३ जानेवारी पासून चालू करण्यात आले होते. ३१ जानेवारीपर्यंत सर्वेक्षण पूर्ण करण्याची मुदत होती, मात्र सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी आणखी काही दिवसांचा वाढीव कालावधी लागण्याची शक्यता होती. त्यानुसार शासनाने २ फेब्रुवारी पर्यंत ही मुदतवाढ दिली होती. नवी मुंबईत सर्व्हेक्षणासाठी सुमारे तीन लाखांहून अधिक कुटुंब होती. यापैकी एकूण ४२ हजार १२१ बंद घरे आढळून आली. तसेच एकूण नऊ हजार ९५ कुटुंबांनी माहिती देण्यास नकार दिला.

सर्व्हेच्या कामासाठी नवी मुंबई महानगर पालिकेचे ८० टक्के कर्मचारी कार्यरत होते. यामध्ये महापालिका शाळेतली शिक्षकांचाही समावेश करण्यात आला होता, मात्र काही शिक्षकांनी आदेश मिळूनही काम केले नसल्याचे समजते. शिक्षक, सिडको कर्मचारी, एमएमएमटीचे कर्मचारी आणि उर्वरित मनपा कर्मचारी असे मिळून एक हजार ६५० कर्मचारी सर्व्हेच्या कामात होते. यामध्ये महापालिका मुख्यालय, तसेच सर्व विभाग कार्यालय यामधील कर्मचाऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर सामावेश होता. परिणामी दैनंदिन कार्यालयीन सेवा बऱ्याच प्रमाणात ठप्प झाली होती. नवी मुंबईकर विभाग कार्यालयात हेलपाटे मारताना दिसत होते.

या सर्वेक्षणासाठी घरो घरी जाऊन ऑनलाईन पद्धतीने (ॲपद्वारे) कुटुंबाची माहिती भरून घेण्यात आली आहे. मराठा कुटुंबाला १६५ प्रश्न विचारून अर्ज भरण्यात आले, तर मराठा व्यतिरिक्त कुटुंबासाठी अल्प प्रश्न होते.

# गांजा विकणारा सराईत आरोपी अटकेत

## पाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

गांजा हा अमली पदार्थ विक्रीस आलेल्या सराईत आरोपीस मुंब्रा पोलीसांकडून अटक त्याचे ताब्यातुन सुमारे २२ किलो वजनाचा गांजा, १ ठंडाई कारसह सुमारे ५,०५००० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

एन.डी.पी.एस पथकातील पोउपनिरी नितीन भोसले यांना मिळालेल्या खात्रीशीर बातमीवरून दिवा चौक जवळील जयेश वाईन शॉपच्या समोर एक व्यक्ती गांजा विक्री करीता येणार आहे. ही बातमीची माहिती पोलीस निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर यांना दिली असता त्यांनी





कारवाई करण्याबाबत आदेशीत केले. त्यानुसार एनडीपीएस पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी जयेश वाईन शॉप जवळ, दिवा येथे सापळा लावला असता रात्री २०:४५ वाजण्याच्या दरम्यान ठिकाणी हुंडाई कारमधुन गांजा विको करण्याकरीता आलेला व्यक्ती रहेमत खान तमिझ खान (वय ३३ वर्षे रा. मुंब्रा) यास शिताफीने ताब्यात घेतले.

त्यांच्या ताब्यातील हुंडाई कार (एमएच ०५ डी.के.२४९७) मधुन २२ किलो ग्रॅम वजनाचा गांजा हा अमली पदार्थ असा जप्त करण्यात आला. २२ किलो ग्रॅम वजनाचा गांजा, हुंडाई कार व आरोपीकडील दोन मोबाईल फोन असा एकुण ५,०५०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आलेला आहे. याबाबत मुंब्रा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. नमुद इसमाने गांजा हा कोठुन व कोठे विकी करण्याकरीता आणला याबाबत तपास सुरू आहे.



# अक्षीकर विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

**उरण : बातमीदार**

शिक्षण क्षेत्रातील प्रसिद्ध नामवंत असलेल्या कै गो.ना.अक्षीकर विद्या संकुलातील जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट इंग्लिश मीडियम स्कूल उरण प्री प्रायमरी आणि प्रायमरी यांच्यातर्फे शाळेमध्ये वार्षिकदिन व पारितोषिक वितरण २०२४ सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी प्रमुख अतिथी म्हणून कमांडर सनद पाटील आयएनएस तुनिर करंजा, माजी उप सभापती वैशाली निलेश पाटील, संचालक मंडळ सदस्य श्री. मेटकरी सर,शशिकांत पाटील, संकुलातील सर्व मुख्याध्यापक माजी शिक्षक आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती ज्ञानेश्वर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाले. कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.

# रोहित पाटीलचे वक्तृत्व स्पर्धेत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वराज मित्र मंडळाने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाच्या रोहित पाटील या विद्यार्थ्याने प्रथम पारितोषिक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रभारी प्राचार्या सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, रोहितने असाधारण वक्तृत्व, आत्मविश्वास आणि उत्कटता दाखवली आहे.वादविवाद समितीच्या प्रभारी सहाय्यक प्राध्यापक धनश्री योगेश कदम यांच्या समर्पित सहभागामुळे त्यांच्या विजयापर्यंतच्या प्रवासाला साथ मिळाली. या पुरस्काराने भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयास मोठा अभिमान आहे आणि संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि क्षमतांचे पालनपोषण करण्याची वचनबद्धता अधोरेखित करते.

रोहित पाटीलच्या अतुलनीय कामगिरीचा आनंद साजरा करण्यात महाविद्यालयास आनंद आहे. आणि हे यश सर्व विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारी आहे.



# 'अंजुमन-इ-इस्लाम'चे अध्यक्ष डॉ. काझी यांचे पद्मश्री पुरस्काराबद्दल अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंजुमन-इ-इस्लाम संस्थेचे अध्यक्ष डॉ. झहीर आय काझी यांना त्यांच्या समाजातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठित पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. ही संस्था शिक्षण आणि समाजकल्याणाच्या वचनबद्धतेसाठी प्रसिद्ध असलेला ट्रस्ट देशभरात एकूण ९७ शैक्षणिक संस्था चालवते. पद्मश्री पुरस्काराबद्दल डॉ. काझी यांचे अभिनंदन होत आहे.

डॉ. झहीर आय काझी यांची पद्मश्रीसाठी निवड शिक्षणाच्या प्रगतीसाठी आणि समुदायांच्या सक्षमीकरणासाठीचे त्यांचे अतूट समर्पण अधोरेखित करते. अंजुमन-इ-इस्लामचे अध्यक्ष या नात्याने, त्यांनी विविध पार्श्वभूमीतील हजारो विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता सुनिश्चित करून शैक्षणिक परिदृश्याला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. डॉ. काझी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, अंजुमन-इ-इस्लाम हे ज्ञान आणि उत्कृष्टतेचे दीपस्तंभ म्हणून उदयास आले आहे, ज्यामध्ये प्राथमिक शालेय शिक्षणापासून ते उच्च शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षणापर्यंत अनेक शैक्षणिक संधी उपलब्ध आहेत. ट्रस्टच्या ९७ शैक्षणिक संस्था शिक्षणाचे आधारस्तंभ म्हणून काम करतात, बौद्धिक वाढ आणि विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगीण विकास करतात.

शिक्षणातील त्यांच्या योगदानाच्या पलीकडे, डॉ. झहीर आय काझी यांच्या कौशल्य विकास आणि सामाजिक कल्याणाच्या उपक्रमांबद्दलच्या



बांधिलकीचा समाजावर खोलवर परिणाम झाला आहे. विविध आउटरीच कार्यक्रम आणि सामुदायिक उपक्रमांद्वारे, त्यांनी उपेक्षित समुदायांच्या उन्नतीसाठी, लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि आंतरधर्मीय सौहार्द वाढवण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत.

पद्मश्री पुरस्कारासाठी डॉ. काझी यांची निवड हे त्यांच्या अनुकरणीय नेतृत्वाचा आणि देशसेवेच्या समर्पणाचा पुरावा आहे. हे सकारात्मक बदलासाठी उत्प्रेरक म्हणून शिक्षण आणि सामाजिक कल्याणाचा प्रचार करण्यासाठी अंजुमन-इ-इस्लामच्या सामूहिक प्रयत्नांनादेखील प्रतिबिंबित करते.

## निवडक

### 'जेएसएस'चा वर्धापन दिन उत्साहात




**अलिबाग** : जनशिक्षण संस्थान रायगड सहाण कार्यालय अलिबाग येथे शनिवारी (दि. ३) कौशल्यावर आधारित मेकअप स्पर्धा व जेएसएसचा वर्धापन दिन जल्लोषात साजरा करण्यात आला. या वेळी जनशिक्षण संस्थान रायगडचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, ॲड. नीला तुळपुळे, बोर्ड मेंबर गितांजली ओक, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे, सामाजिक कार्यकर्त्या प्रतीक्षा सचिन चव्हाण, कर्मचारी कल्पना म्हात्रे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी वेदांती पाटील, साधन व्यक्ती अस्मिता भोईर, वृषाली भागवत, साक्षी पाटील यांच्यासह इतर महिला उपस्थित होते.

### माणगाव पतसंस्थेचा वर्धापन दिन



**माणगाव** : माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, उतेखोलचा रौप्य महोत्सवी वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त सत्यनारायणाची महापूजा आणि हळदी-कुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. पतसंस्थेच्या भागधारक, खातेदार, हितचिंतक व मित्रपरिवार यांनी सत्यनारायणाची महापूजेच्या तीर्थप्रसादाचा लाभ घेतला, तर हळदी-कुंकू समारंभात महिला सहभागी झाल्या होत्या. पतसंस्थेचे चेअरमन आनंद यादव व सहकाऱ्यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले. वर्धापन दिन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चेअरमन, व्हाईस चेअरमन मदनलाल जैन, सर्व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड, कर्मचारी व स्वल्पबचत प्रतिनिधी यांनी परिश्रम घेतले.

### प्रा. माणिकराव साळवे सेवानिवृत्त

**माणगाव** : अशोकदादा साबळे कनिष्ठ महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेले माणिकराव गोविंदराव साळवे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. सन १९९३मध्ये आपल्या कार्याची सुरुवात केलेल्या साळवे सरांनी या विद्यालयात ३१ वर्षे सेवा केली असून ते इतिहासाचे गाढे अभ्यासक आहेत. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सेक्रेटरी कृष्णा गांधी, चेअरमन नरेंद्र गायकवाड, संचालक नितीन बामुगडे यांचे हस्ते स्मृतीचिन्ह, भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला, तर शाळेच्या वतीने प्राचार्य धनाजी जाधव उपप्राचार्य जमदाडे, उपमुख्याध्यापक उभारे यांनी त्यांचा यथोचित सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या सेवेचा गौरव केला व शुभेच्छा दिल्या.

### मुळगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह

**खोपोली** : नगरपालिका हद्दीतील मुळगाव येथील भैरवी मंदिराच्या प्रांगणात ७ ते ११ फेब्रुवारीदरम्यान हभप तानाजी महाराज कर्णुक यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजक चंद्रकांत शेंडे व केतन शेंडे यांनी सांगितले. यादरम्यान महापूजा, कलश पूजन, विणापूजन, ग्रंथपूजन यासोबतच प्रवीण महाराज शिंदे (खोपोली), किरण महाराज घोसाळकर (सावरोली), प्रणित महाराज महाबदी (पौद) यांचे प्रवचन, माधव महाराज कर्णुक (बीडखुर्द), प्रभाकर महाराज झोलकर (गंगाखेड), अश्विनी भोईर (अलिबाग), चंद्रशेखर महाराज देगलूरकर (आळंदी) किर्तन होणार आहे. ११ फेब्रुवारी रोजी अमोल महाराज बडाख (नगर) यांचे काल्याचे किर्तन होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# भाजपची लोकसभेसाठी तयारी सुरू

## सुधागडात पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक; ७ फेब्रुवारी रोजी जाहीर सभा

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपच्या स्थानिक नेतेमंडळींकडून मोर्चेबांधणी सुरू आहे.



येत्या ७ फेब्रुवारी रोजी पाली येथे जाहीर सभा होणार असून भाजपच्या महिला आघाडीच्या नेत्या व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष नीलिमा पाटील यांनी कंबर कसली आहे. त्या अनुषंगाने शुक्रवारी (दि. २) सुधागड तालुक्यातील २१ गणपती, मराठा समाजहॉल येथे माजी जि. प. अध्यक्ष नीलिमा पाटील यांच्या उपस्थितीत सिद्धेश्वर, आपटवणे, आतोने, भार्जे, अडुळसे, नाडसूर, पाचापूर अशा सहा ग्रामपंचायतींची संयुक्त सभा पार पडली.

या सभेला सर्व ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी निलिमा पाटील यांनी, गणपती मंदिरात २१ गणपतीला वंदन करून सर्वांचे आशीर्वाद असेच असू द्या, अशी प्रार्थना केली. सर्वांच्या सहकार्याने व मदतीने आपल्याला विजयी व्हायचे आहे. अशी जिद्द आणि संकल्प ठेवून आपण सर्वांनी कामाला लागा, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

पेण-सुधागड मतदारसंघात माजी आमदार मोहन पाटील यांचे सुरुवातीपासून वर्चस्व आहे. २५ वर्षांच्या आमदारकीच्या काळात भाई पाटील यांनी मोठ्या प्रमाणात विकासात्मक कामे मार्गी लावली असून सुधागडातील गावखेड्यात विकासकामात त्यांचा कोणी हात धरू शकत नाही. त्यांच्या कारकिर्दीत समाजमंदिर, नाट्यगृह, रस्ते, प्रवाशांसाठी एसटी बसथांबे, आदिवासी वाड्यांवर स्मशानभूमी, प्राथमिक शाळा, अंगणवाड्या आणि विविध विकासकामे केलेल्या आठवणी सुधागडातील जनतेसमोर आजही दिसत आहेत. त्यांच्या पश्चात त्यांच्या पावलांवर पाऊल ठेवत माजी आमदार तथा भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील काम करीत आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सुधागड तालुक्यात पाली येथे ७ फेब्रुवारी रोजी जाहीर सभा होणार आहे. भाजप महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य व जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली या सभेची जय्यत तयारी सुरू असून लोकसभेत विजयासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी कंबर कसली आहे.

राजेश मपारा यांनी सांगितले की, निवडणुकीच्या काळात आपण विकासकामांकडे बघून आपली ताकद दाखवायची आहे. त्यामुळे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागा, असे आवाहन मपारा यांनी केले. या वेळी सुधागड भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, पाली उपनगराध्यक्ष आरिफ मनियार, प्रणाली शेठ, वकील सुभाष पाटील, चंद्रकांत गोफण, नरेश खाडे, शरद चोरगे, आतोणे सरपंच, माजी उपसरपंच व तंटामुक्ती अध्यक्ष सिद्धेश्वरचे भाजप कार्यकर्ते संजय शिंदे, माजी उपसरपंच योगेश सुरावकर सिद्धेश्वर आदी उपस्थित होते.

# रोहा रेल्वे वसाहतीजवळ पट्टेरी वाघाचा वावर

**नागोठणे : बातमीदार**

रोहा शहरापासून काही अंतरावर असणाऱ्या निडीतर्फे अष्टमीजवळील रेल्वे वसाहतीशेजारी शुक्रवारी (दि.२) रात्री १२.३० वा.च्या सुमारास पट्टेरी वाघ काही तरुणांच्या निदर्शनास आला.

मिळालेल्या माहितीनुसार निडी गावातील दयाराम चोरगे, हनुमंत चोरगे व सिद्धेश पाटील हे तीन ग्रामस्थ रात्रीच्या सुमारास घराबाहेर गप्पा मारत होते. तेव्हा त्यांना शेजारी असणाऱ्या रेल्वे वसाहतीत काही हालचाल होताना पहिली. कोण आहे हे पाहण्यासाठी त्यांनी बॅटरी लावून पहिले तेव्हा त्यांना पट्टेरी वाघ असल्याचे जाणवले.



हा पट्टेरी वाघ निडी गावाशेजारील असलेल्या कुंडलिका नदीवर पाणी पिण्यासाठी नेहमी जात असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. पट्टेरी वाघ गावातून नेहमी येत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे येथील शेतकरी त्याचप्रमाणे नागरिक भयभीत झाले आहेत.

# भारतीय तटरक्षक दलाची समर्पित सेवा बाईक रॅली



**मुरूड : प्रतिनिधी**

अढळ धैर्य आणि बांधिलकीने सागरी सीमांचे रक्षण करण्याच्या सेवेचे मर्म तसेच राष्ट्रसेवेत तैनात शूर सैनिकांच्या मूल्यांचे प्रतिबिंब असलेल्या कर्तव्य आणि समर्पणाच्या संकल्पावर प्रकाश टाकून मच्छीमार समुदायांमध्ये देशभक्तीचा संदेश देण्याच्या उद्देशाने बाईक रॅलीचे पथक कोची, बेपोर, न्यू मंगलोर, गोवा, आणि रत्नागिरीमार्गे किनारपट्टीवरील विविध मच्छीमार समुदायांशी संवाद साधत मंगळवारी (दि. ३०) मुरूड जंजिरा येथे भारतीय तटरक्षक दलाचे बाईक रॅलीचे आगमन झाले.

पथक गुरुवारी (दि. १) तटरक्षक क्षेत्र (पश्चिम) मुंबई येथे पोहचले. पुढील तीन दिवसांत मुरूड जंजिरा आयसीजी युनिटमधील सेवारत कर्मचारी यांची टीम तसेच दमणच्या आयसीजी युनिट्समधील टीमसोबत सामील होणार आहे. बाईक रॅली राजपुरी, मुरूड आणि बोर्ली या ग्रामीण भागातून मार्गस्थ झाली.

सागरी सुरक्षेच्या उपाययोजना, सागरी नियमांचे पालन, पर्यावरण संवर्धन, बेटी बचाओ बेटी पढाओ अभियान आदींबाबत जनजागृती करण्यासाठी सामुदायिक संवाद कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते.

# एकदरा जि.प. शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन रंगले

**मुरूड : प्रतिनिधी**

एकदरा येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस ५० वर्ष पूर्ण झाली, ही अभिमानास्पद बाब आहे. जसे शैक्षणिक कार्यक्रमासाठी सर्व बांधव एकत्र आले त्याचप्रमाणे इतर कार्यक्रमांमध्येसुद्धा सर्वांनी एकजुटीने राहून गावचा विकास साधूया. आमदार महेंद्र दळवी हे विकास निधी देण्यात कधीच कमी पडणार नाही, असे प्रतिपादन शिवसेनेचे नेते व नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विलास सुर्वे यांनी केले.

एकदरा येथील जि.प. प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. त्याचा शुभारंभ भाई सुर्वे यांनी श्रीफळ वाढवून, तर सरपंच ज्योती वाघरे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर शाळा व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष चिंतामणी लोदी, उपाध्यक्ष टारझन मढवी, जगन वाघरे, चंद्रकांत पाटील, पांडुरंग आगरकर, धुर्व लोदी, मनोहर गंबास, धर्मा लोदी, नरेंद्र वाघरे, माजी जि.प. सदस्य नेहा पाके, मुख्याध्यापक संजय झिराडकर, करुणा पाटील, भालचंद्र मढवी, विजय पाटील, राजेश लोदी, अरविंद पाटील, रमेश गंबास आदी उपस्थित होते.

या स्नेहसंमेलनात शालेय विद्यार्थ्यांनी विविध नृत्य व नाटिका सादर केल्या. या वेळी एकदरा ग्रामस्थांनी गर्दी केली होती.

# गुरे चोरणाऱ्यांवर कारवाई करावी

## आदिवासी ठाकूर कातकरी संघटनेची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्याच्या काही भागात गुरांची चोरी करण्याचे प्रकार वाढले आहे. ती रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाने चोरी करणाऱ्या चोरांना पकडून शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी आदिवासी ठाकूर कातकरी संघटनेकडून कर्जत आणि नेरळ पोलीस ठाणे यांना निवेदन देऊन केली आहे.



कर्जत तालुका हा मोठ्या प्रमाणात ग्रामीण भाग असलेला तालुका असून तालुक्यात बहुल आदिवासी भाग आहे. आदिवासी समाज मोलमजुरी करून शेती हा प्रमुख व्यवसाय करतो. शेतीसाठी प्रत्येक घरी गाय, बैल, शेळी, म्हैस अशा अनेक प्रकाराची मुकी जनावरे पाळली जात असतात, परंतु काही महिन्यांपासून ती मुकी जनावरे अज्ञात व्यक्तींकडून चोरून नेली जात आहेत. त्यामुळे आदिवासी समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आदिवासी बांधवांनी याबाबत तक्रारी कर्जत, नेरळ येथील पोलीस ठाण्यात नोंदवल्या आहेत. तरीही मुक्या जनावरे चोरून नेण्याच्या घटना घडत आहेत.

प्रामुख्याने कशेळे, पिंगळस, खांदन, शिलार, मार्गाची वाडी, बोरीवली, काठेवाडी डामसेवाडी, खांडस, ओलमण या विभागात मोठ्या प्रमाणात मुक्या जनावरांच्या चोऱ्या होत आहेत. त्यामुळे आदिवासी समाज संघटनेने पोलीस ठाण्यात निवेदन दिले. या वेळी राजिपचे माजी समाज कल्याण सभापती नारायण डामसे, आदिवासी समाज संघटना कर्जत अध्यक्ष परशुराम दरवडा, सचिव भगवान भगत, उपाध्यक्ष मंगळ केवारी, पांडूरंग पुजारी, गणपत सांबरी, काशिनाथ पादीर, अर्जुन केवारी, महेश निरगुडा आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुरूड सुरूळपेठ ते मासळी मार्केट रस्त्याचे भूमिपूजन





**मुरूड : प्रतिनिधी**

नांदगाव ग्रामपंचायत शिवसेनेची नसली तरी प्राधान्य नांदगाव ग्रामपंचायतीच्या विकासकामांना देणार आहोत. नांदगावमध्ये सर्व जातीधर्माचे लोक एकोप्याने राहत असून येथील विकासकामे लवकरात लवकर मार्गी लावण्याची माझी जबाबदारी असून येत्या काळात मोठमोठी विकासकामे येथे पार पडली जाणार आहेत. सुरूळपेठ अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी लवकरच निधी उपलब्ध करून देणार असल्याचे अभिवचन आमदार महेंद्र दळवी यांनी दिले.

सुरूळपेठचे मुख्य प्रवेशद्वार ते मासळी मार्केट येथपर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खाते या विभागामार्फत ८० लाख रुपये मंजूर झाले आहेत. या कामाचे भूमिपूजन आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते झाले. या वेळी शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, मुरूड शहर प्रमुख संदीप पाटील, तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, माजी सरपंच भाई सुर्वे, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, नांदगाव सरपंच अल्पा घुमकर, तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष फैरोज घलटे, ग्रामपंचायत सदस्य अस्लम हलडे, विकी कुबल, माजी सरपंच मोअज्ञम हसवारे, नितीन आंबुर्ले आदी उपस्थित होते.

आमदार महेंद्र दळवी यांनी, साळाव ते आगरदांडा रस्त्याच्या रुंदीकरणासाठी मोठा निधी लवकरच प्राप्त होणार आहे. यासाठी माझे प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. कोस्टल हायवे हा एमएसआरडीसी बनवणार असून सदरचा रस्ता हा चार मार्गिकांनी जोडला जाणार आहे. या रस्त्याचा फायदा तालुक्यातील नागरिकांनासुद्धा होणार आहे. कोस्टल हायवे मुरूड-अलिबागसाठी वरदान ठरणार असून या मार्गामुळे भविष्यात पर्यटक संख्या मोठ्या पटीने वाढणार आहे. विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही, असे सांगितले.

# मुरूड निवासी नायब तहसीलदारपदी संजय तवर



**मुरूड : प्रतिनिधी**

तहसीलदार कार्यालयात लिपिक संवर्गतूनपदी असलेल्या संजय तवर यांना नायब तहसीलदारपदी बढती मिळाली असून त्यांची नायब तहसीलदारपदी नेमणूक करण्यात आली.

नुकताच त्यांनी कार्यभार स्वीकारला. त्या वेळी तहसीलदार रोहन शिंदे, नायब तहसीलदार राजेश्री साळवी, पं. स. विस्तार अधिकारी सुभाष वाणी, रोहन निगुडकर, विजय म्हापुसकर, रिमा कदम, प्रतिक पावसकर, जिविका ठाकुर, अमृत चोगले, छाया वरसोलकर, ज्ञानोबा तिथे, आरती म्हात्रे आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत पनवेलचे खेळाडू करणार महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व



**पनवेल : प्रतिनिधी**

वीर तायक्वांदो असोसिएशन ऑफ पनवेलचे खेळाडू जयपूर (राजस्थान) येथे होणाऱ्या राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत महाराष्ट्र संघांचे प्रतिनिधित्व करणार असल्याची माहिती असोसिएशनचे सेक्रेटरी संजय भोईर उपाध्यक्ष हेमंत कोळी यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य तायक्वांदो असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित नमो चषक स्पर्धा २७ ते २९ जानेवारीदरम्यान नाशिक येथील मीनाताई ठाकरे स्टेडियममध्ये झाली. या स्पर्धेत वीर तायक्वादो असोसिएशन ऑफ पनवेलचे खेळाडू आयुष अभिजीत कदम, मुस्तफा शेख, निहाल संजय भोईर यांनी सुवर्ण; खंतेश बाळाराम वासकर, श्रीजय हरेश्वर भगत यांनी रौप्य; तर तेजल सुहास लाहोटी हिने कांस्यपदक जिंकले. अपूर्वा देसाई, हुसेन शेख, आयान शेख यांनी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते खेळाडू जयपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करतील.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष अनिल झोडगे, महासचिव संदीप ओंबासे खजिनदार डॉ. प्रसाद कुलकर्णी, सीईओ गफार पठाण तसेच रायगड जिल्हा संघटनेच्या अध्यक्ष ॲड. प्रज्ञा भगत, उपाध्यक्ष तसेच वीर तायक्वांदो असोसिएशनचे सेक्रेटरी संजय भोईर, अध्यक्ष हरेश्वर भगत, उपाध्यक्ष हेमंत कोळी, खजिनदार संदीप भगत, निखिल भोईर, गणेश शिंदे, प्रशिक्षक, खेळाडू तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.



# तासगावकर शैक्षणिक संकुलात क्रीडा महोत्सव

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील यादवराव तासगावकर तंत्रनिकेतन कॉलेज येथे रायगड जिल्हा विभागीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आलें. महाविद्यालयाच्या सर्व शाखांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी या क्रीडा महोत्सवात सहभाग घेतला.

कर्जतच्या चांदई आणि डिकसळ येथे असलेल्या तासगावकर शैक्षणिक संकुलात अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, फार्मसी महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले गेले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन कर्जत पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी, प्रत्येक स्पर्धेत हार-जीत असते. त्यामुळे सर्व खेळाडूंनी संघभावना ठेवून व क्रीडा भावना जोपासून खेळाचा आनंद घ्यावा, असे आवाहन केले.

महाराष्ट्र राज्य इंटर इंजिनिअरिंग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स असोसिएशन आणि तासगावकर तंत्रनिकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत खो-खो, कबड्डी व व्हॉलीबॉल अशा खेळांचा समावेश आहे. स्पर्धेच्या उद्घाटनावेळी तासगावकर तंत्रनिकेतन कॉलेजचे प्राचार्य रामेश्वर खनपटे, एचआर रमाकांत तरे उपस्थित होते.

# रायगडच्या गार्गी पाटीलला राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्तीसगडमधील रायपूर येथे झालेल्या ३७व्या राष्ट्रीय तायक्वांदो सब-ज्युनियर क्युरेगी स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघातील रायगडची खेळाडू गार्गी पाटील हिने वेगवान खेळ दाखवून सुवर्णपदक पटकाविले. या स्पर्धेत २८ राज्यांतून ८०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

या यशात गार्गीला आई-वडिलांचे सहकार्य व प्रमुख प्रशिक्षक सुभाष पाटील, सहाय्यक प्रशिक्षक तेजस माळी व रूपेश माळी यांचे मार्गदर्शन लाभले.

रायगड तायक्वांदो असोसिएशन, तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे पदाधिकारी, प्रशिक्षक व खेळाडूंनी गार्गीचे अभिनंदन केले, तर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ८ फेब्रुवारी रोजी गार्गीचा सत्कार होणार आहे.

# शिरवणे येथे राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे येथील श्री गणेश व्यायामशाळेत पॉवरलिफ्टर्स असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने ३०वी इंडियन नॅशनल पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन व पारितोषिक वितरण नवी मुंबईचे माजी महापौर जयवंत सुतार यांच्या हस्ते झाले.



स्पर्धेत केरळ, आसाम, गोवा, छत्तीसगड, कर्नाटक, आंध्र प्रदेश, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र राज्यातील मुले, मुली, महिला, पुरुष अशा दोनशेहून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. छत्तीसगडच्या ठाणेश्वर निषाद यांनी ज्युनिअर स्ट्राँग बॉय ऑफ इंडिया, गोव्यातील जोवेट्टी मॉनिस यांनी स्ट्राँग गर्ल ऑफ इंडिया, गोव्याच्याच रजत गाडेकर यांनी सिनियर स्ट्राँग मॅन ऑफ इंडिया, महाराष्ट्रातील रश्मी जिझिलवन यांनी सिनियर स्ट्राँग वूमन ऑफ इंडिया, कर्नाटकच्या ए. चंद्रप्पा यांनी स्ट्राँग मास्टर मॅन ऑफ इंडिया, महाराष्ट्रातील शितल आनंद यांनी स्ट्राँग मास्टर वूमन ऑफ इंडिया हा मानाचा किताब पटकाविला.

ज्युनिअर आणि सिनिअर गटात श्री गणेश व्यायामशाळेच्या दस्तगीर, जसविंदर सिंग बधेशा, शितल शास्त्री यांनी सुवर्णपदक; मोहम्मद जिशान, फैसल अन्सारी यांनी रौप्यपदक; तर तुषार गर्जे, अथर्व कारंडे, जगदिश जैस्वाल, शुभम कुंभार, विनीत माने यांनी रौप्यपदक जिंकले.

स्पर्धेस माजी नगरसेविका माधुरी सुतार, वेदमूर्ती प्रवीण जोशी, पी.एम. भोईर, राजमहावीर सिंग, लियो पीटर, श्यामबाबू मेहता, सुरेश साळवी, परविंदर सिंग सैनी, राकेश साहू, लक्ष्मी देवी, महेश पानसे आदी उपस्थित होते.

# डी.वाय. पाटील विद्यापीठातर्फे बायोझेस्ट क्रीडा स्पर्धा




**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईतील नेरूळ येथील डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या वतीने बायोझेस्ट २०२४ अंतर्गत विविध क्रीडा स्पर्धा उत्साहात झाली. या स्पर्धेचे आयोजन संचालक डॉ. देबजानी दासगुप्ता तसेच क्रीडा समिती अध्यक्ष गणेश ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

क्रीडा स्पर्धेत क्रिकेट, फुटबॉल, बॉक्स क्रिकेट, व्हॉलीबॉल, शॉर्टपुट, बुद्धीबळ, रस्सीखेच व इतर खेळांचा समावेश होता. स्पर्धेत ५००हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या वेळी शरीरसौष्ठवपटू सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांची लाभली. त्यांनी मुलांना क्रीडा स्पर्धा, व्यायामाविषयी संबोधित केले व मनोबल वाढवले.


## रोहा तळाघर येथे १० फेब्रुवारीला कबड्डी स्पर्धा

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात प्रथमच तळाघर येथे तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन गावदेवी क्रीडा मंडळाने १० फेब्रुवारी रोजी केले आहे. स्पर्धा तालुका कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने खेळविण्यात येणार आहे.

प्रथम येणाऱ्या ३२ संघांना प्रवेश दिला जाईल. संघातील प्रत्येक खेळाडू हा गावातील असवा. प्रथम क्रमांक १५ हजार रुपये, द्वितीय १० हजार रु., तृतीय व चतुर्थ क्रमांक सात हजार रु. आणि चारही विजेत्यांना चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे मालिकावीर, पकड व चढाईसाठी आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत.

सहभाग तसेच अधिक माहितीसाठी प्रशांत मोरे (८०८०५०२६२९), जयवंत कांबळे (७८७५६६८१८०), सुमित भगत (७०६६६८२०११), स्वप्नील कांबळे (८९७५९१०८७४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येणार आहे.




# उद्यापासून सांगलीत राज्य खो-खो स्पर्धा

**सांगली : प्रतिनिधी**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालयाच्या मान्यतेने कै. भाई नेरुरकर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा ५ ते ८ फेब्रुवारी या कालावधीत कुपवाड येथील अकूज ड्रीमलेंड (ता. मिरज जि. सांगली) येथे होत आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, सांगली जिल्हा प्रशासन आणि महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या माध्यमातून होणाऱ्या या स्पर्धेत महिला व पुरुष, किशोर व किशोरी गटाचे मिळून ४० संघ सहभागी होणार आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी क्रीडामंत्री संजय बनसोडे, कामगार मंत्री व पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे, स्वागताध्यक्ष आमदार सुधीर गाडगीळ उपस्थित राहणार आहेत.

या स्पर्धेत खेळाडू, संघव्यवस्थापक, पंच, संघटना प्रतिनिधी, शासकीय अधिकारी असे एकूण ७८० जण सहभागी होणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सचिव व स्पर्धा आयोजन सचिव गोविंद शर्मा, सांगली जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, क्रीडा व युवक सेवा कोल्हापूर विभाग उपसंचालक माणिक पाटील व प्रशांत इनामदार यांनी दिली.






**पनवेल : कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते व थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांचे पुत्र आणि भाजप माथाडी, ट्रान्सपोर्ट, सुरक्षारक्षक व जनरल कामगार युनियनचे उपाध्यक्ष संजय भगत यांच्या वाढदिवसानिमित्त रोहिदास वाडा येथे आयोजित क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह येथे परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजप शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच पी.डी. भोईर, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, भटके विमुक्त आघाडीचे शहराध्यक्ष चंद्रकांत मंजुळे, अरुणा पाटील, कविता पाटील, विनायक मुंबईकर, मधुकर उरणकर आदी उपस्थित होते.**




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com